आतील पानात...

३ भीमा-पाटस कारखान्याचा २५ वर्षांचा कारभार कर्नाटकच्या कंपनीच्या दावणीला?

४ पुरुषोत्तम मासानिमित्त पुणतांब्यात अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

५ पिसोरे बुद्रुक येथे मध्यरात्री जुगार अड्ड्यावर छापा : ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त



पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952



पान ८ वर..





सोमवार, दि. १८ मे २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०२४ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com


# पुण्याला देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून विकसित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुणे शहराला देशाचे 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' म्हणून ओळख मिळत असून ती पुढे नेण्यासाठी मेट्रोचे जाळे, रस्त्यांची सुधारणा, भूमिगत बोगद्यांचे जाळे तयार करणे आदी माध्यमातून उत्तम वाहतुकीची व्यवस्था, चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्तम जीवनशैली सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुणे शहरात हाती घेतलेले प्रकल्प पुढील ३ ते ४ वर्षात पूर्ण झाल्यानंतर देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून ओळखले जावे यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही ते म्हणाले.

मोहम्मदवाडी येथील समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या साठवण टाक्यांचे लोकार्पण तसेच मुंढवा येथील महात्मा फुले चौक ते खराडी मेट्रो समवेत दुमजली उड्डाणपुलाचे ऑनलाइन भूमिपूजनासह विविध प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजननिमित्त रहेजा चौक, दोराबजी मॉल जवळ, मोहम्मद वाडी हडपसर येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार योगेश टिळेकर, चेतन तुपे, भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते.

पुण्याचा नवीन विमानतळ, नवीन रिंग रोड, हडपसर पासून यवतपर्यंत आधुनिक प्रकारचा उन्नत मार्ग आदी सर्व माध्यमातून पुण्याची जोडणी चांगली करण्याचा प्रयत्न आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, गतवर्षी एकट्या पुण्यात देशातील



२५ टक्के जीसीसी तयार झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रानंतर पुढील लाट जीसीसीची असून त्यात पुणे पुढे चालले आहे. ते पुढे नेण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुण्याला एक आधुनिक शहर म्हणून पुढे नेण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. महात्मा फुले चौक ते खराडी हा मेट्रोसह दुमजली पूल उभारण्यात येत असून त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यासह प्रवासातील १५ ते २० वाचणार आहेत. पुण्याला गतिमान करण्याच्या प्रयत्नातील हा एक महत्वाचा पूल आहे. कोंढवा परिसरातील रखडलेल्या कात्रज कोंढवा रस्त्याचे येत्या ६ महिन्यात भूसंपादन होऊन हा रस्ता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले.देशातील पहिले पीपीपी तत्वावर दर्जेदार आरोग्य सेवा उभी करता येते हे या कर्करोग उपचार रुग्णालयाच्या उभारणीवरून दिसून येते. राज्यात मोठ्या प्रमाणात कॅन्सर ग्रीड तयार करण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न सुरू आहे. या ग्रीडच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला कॅन्सरवरील आधुनिक उपचार वेळेत आणि अत्यल्प दरात वा मोफत मिळाला पाहिजे असे प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये हे रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

या रुग्णालयात अतिशय आधुनिक अशा गामा स्कॅन, पेट स्कॅन आदींसह उपचार सुविधा सामान्य नागरिकांना केंद्र सरकारच्या सीजीएचएस योजनेप्रमाणे अतिशय अल्प दरात मिळणार आहेत. शासनाच्या सर्व योजना या ठिकाणी मिळणार आहेत. कॅन्सर सारखा आजार वेगाने वाढत असताना त्याचे उपचार प्रदीर्घ व खर्चिक होतात. हे पाहता पुणेकरांसाठी हे रुग्णालय एक वरदान ठरेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

ते पुढे म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज हे बुधभूषण ग्रंथ लिहित आहेत अशा स्वरूपाचे शिल्प छत्रपती संभाजी उद्यान येथे उभारले आहे. ११ भाषा ज्ञात असलेले छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या १४ व्या वर्षी हा संस्कृत ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचा प्रत्यक्ष नमुना आहे. या ग्रंथातील १० श्लोकांचा शिल्पात समावेश केला असून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शहाजी महाराज यांचे व्यक्तिमत्व त्यातून समजण्यास मदत होते.

## संक्षिप्त

### विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : अरबी समुद्र आणि अंदमान परिसरात मान्सूनची आगेकूच सुरू झाली असताना, महाराष्ट्रात तापमानाचा पारा वाढला आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले असून, अनेक भागांत उन्हाचा कडाका तीव्र जाणवत आहे. तसेच पूर्वमोसमी वादळी पावसाला देखील पोषक हवामान आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मराठवाडा, विदर्भात उष्णतेची लाट येण्याचा, तर कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्याच्या दक्षिणेकडील जिल्ह्यात वादळी पावसाचा अंदाज असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय हवामान विभागाने आज (रविवार) मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. विशेषतः अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांत तापमानाचा पारा उच्चांक गाठण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे.


### नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून खून केल्याप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध विशेष न्यायालयात ११०० पानांचे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १४ दिवसांत दोषारोपपत्र दाखल करण्यात आल्याने तपासाची गती आणि कार्यपद्धती विशेष ठरली. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी पुढील आठवड्यात या प्रकरणाची ट्रायल सुरू होणार असल्याची माहिती दिली. दोषारोपपत्रात आरोपीची संपूर्ण माहिती, त्याची गुन्ह्यातील भूमिका आणि घटनाक्रमाचा सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. पीडित बालिकेचे वय सिद्ध करणारे अधिकृत पुरावे दोषारोपपत्रात समाविष्ट करण्यात आले आहेत. लैंगिक अत्याचार व खुनासंदर्भातील वैद्यकीय अहवाल आणि शवविच्छेदन अहवाल महत्त्वाचे पुरावे म्हणून जोडले आहेत.

## दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा शिरवता धरणात बुडून मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**



पवनानगर : मावळ तालुक्यातील शिरवता धरण परिसरात फिरण्यासाठी आलेल्या सहा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पर्यटनस्थळी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात शिक्षण घेणारे सहा विद्यार्थी पर्यटनासाठी शिरवता धरण परिसरात आले होते. धरणाच्या पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघांचा तोल जाऊन ते खोल पाण्यात बुडाले. या दुर्घटनेत आर्या सुशांत बांदावर (वय २०, रा. गोंदिया) आणि करण ज्ञानदेव ठोंबरे (वय १९, रा. सातारा) यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वन्यजीव रक्षक मावळ संस्थेची आपत्ती व्यवस्थापन टीम तसेच शिवदुर्ग मित्र लोणावळा संस्थेचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दोन्ही युवकांना पाण्याबाहेर काढून रुग्णवाहिकेतून कामशेत येथील रुग्णालयात हलविले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

यानंतर दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी तळेगाव दाभाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. या प्रकरणाची नोंद कामशेत पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे दरम्यान, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धरण परिसरातील पाण्याची पातळी आणि खोली वाढलेली असल्याने पर्यटकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## 'नीट' पेपरफुटी प्रकरणात मनीषा मांढरेला सीबीआय' कोठडी

**जनप्रवास । प्रतिनिधी**



पुणे : देशभरात गाजत असलेल्या नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातून अटक करण्यात आलेल्या जीवशास्त्राच्या अध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरे हिला दिल्लीतील केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) विशेष न्यायालयाने चौदा दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

मनीषा मांढरे परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे. या प्रकरणात त्यांची दिल्लीत चौकशी करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने तिचा वनस्पतिशास्त्र, तसेच प्राणिशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकांशी संबंध होता. या प्रकरणात बिबवेवाडीतील ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आली आहे. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मांढरेला घरी बोलावले होते. तेथे मांढरेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती दिली. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर मांढरेला अटक करण्यात आली. या प्रकरणात मांढरेला रविवारी दिल्लीतील विशेष सीबीआय' न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणाचे तपास अधिकारी उपअधीक्षक पवन कुमार यांनी मांढरे हिला विशेष न्यायाधीश रश्मी कुजूर यांच्या न्यायालयात रविवारी हजर केले. सीबीआय'कडून व्ही. के. पाठक आणि दर्शन लाल यांनी बाजू मांडली. या प्रकरणात मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, तसेच ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारेला अटक करण्यात आली आहे. पेपरफुटी प्रकरणात आरोपींनी संगनमत केले. आरोपी मांढरे ही परीक्षाप्रक्रियेशी (एनटीए) संबंधित आहे. विशेष मार्गदर्शनाच्या नावाखाली त्यांनी विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले. परीक्षेतील प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती त्यांना विद्यार्थ्यांना दिली होती. या प्रकरणात आतापर्यंत नऊ आरोपींना अटक करण्यात आली असून, नीट' प्रश्नपत्रिका फूट प्रकरणाचा सखोल तपास करायचा आहे. आरोपींची एकत्र चौकशी करायची आहे. तपासासाठी चौदा दिवसांची सीबीआय कोठडी देण्यात यावी, अशी विनंती पाठक आणि लाल यांनी युक्तिवादात केली. सीबीआय'च्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून विशेष न्यायाधीश रश्मी कुजूर यांनी मांढरेला चौदा दिवस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## पुणेकरांना इंधन दरवाढीचा फटका

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : इंधन दरवाढीचा थेट फटका ग्राहकांना बसत असून फळे, भाजीपाला, कडधान्य घेऊन येणाऱ्या वाहनांचे भाडे वाढणार असल्यामुळे दरात लक्षणीय वाढ होणार असल्याचा अंदाज व्यापारी वर्तवत आहेत. त्यामुळे ग्राहकांवर महागाईचा ताण येणार असून आर्थिक नियोजनही कोलमडणार आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ३ रुपयांपेक्षा अधिकची वाढ झाली आहे.

या दरवाढीमुळे कडधान्य आणि शेतीमाल घेऊन बाजारात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे भाडे वाढणार आहे. त्याचा थेट परिणाम दरवाढीवर होणार असल्यामुळे घाऊक आणि किरकोळ बाजारातील दर वाढणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना अधिकच्या दराने कडधान्य, फळे, भाजीपाला खरेदी करावा लागणार आहे. वाढलेल्या दराचा खिशावर ताण येणार असल्यामुळे ग्राहकांना आता खरेदी करताना विचार करावा लागणार आहे. यामुळे सामान्य नागरिकांचे महागाईने कंबरडे मोडत आहे.

इंधन दरवाढीमुळे वाढलेला वाहतूक खर्च शेतकऱ्यांना द्यावा लागणार आहे. किरकोळ विक्रेत्यांचा वाहतूक खर्च वाढणार असल्यामुळे ते कडधान्य, फळे, भाजीपाल्याची अधिकच्या दराने विक्री करावी लागत आहे. परिणाम म्हणून भाजीपाला महाग होणार आहे. फळे व भाजीपाल्याच्या दरात १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. – विलास भुजबळ, ज्येष्ठ अडते, मार्केटयार्ड.

### फळे,भाजीपाल्याचे दर भडकले



### ज्या प्रमाणात वाहतूक खर्चात वाढ , त्या प्रमाणात महागाई

मार्केटयार्डातील भुसार विभागात राज्यासह परराज्यातून माल येत असतो. इंधनाचे दर वाढल्यामुळे भाड्यातही मोठी वाढ होणार आहे. ज्या प्रमाणात वाहतूक खर्च वाढेल, त्या प्रमाणात भुसार मालाचे दर वाढतील. विशेषत: ज्या-ज्या मालाची वाहतूक होते, त्या सर्व मालाचे दर वाढणार असल्याने त्यांचा फटका व्यापाऱ्यांसह ग्राहकांनाही फटका बसणार आहे.

**– अभय संचेती, ज्येष्ठ व्यापारी, मार्केटयार्ड**

## खडकवासल्यात हिट अँड रन' ; मोटारीच्या धडकेत चार वर्षीय बालकाचा मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : खडकवासला भागात मद्यधुंद मोटारचालकाने भरधाव कार चालवत दुचाकीला धडक दिल्याने चार वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीस्वार व त्यांची पत्नी जखमी झाले असून नागरिकांनी मोटारचालकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

यशराज नीलेश कांबळे (वय ४, रा. धायरी) असे मृत्यू झालेल्या बालकाचे नाव आहे. तर त्याचे वडील नीलेश कांबळे (वय ३६) आणि आई जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीलेश कांबळे हे भाजीपाला विक्रेते असून शनिवारी सायंकाळी पत्नी व मुलासह खडकवासल्याहून पुण्याकडे दुचाकीवरून जात होते. खडकवासला भाजी मंडई परिसरात भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यानंतर कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अन्य वाहनांनाही धडक दिली. अपघातानंतर मोटारचालक अमोल गोरक्षनाथ गेगडे (वय ३६, रा. अहिल्यानगर) हा पसार होण्याच्या तयारीत असताना नागरिकांनी त्याला पकडून चोप दिला व नंतर पोलिसांच्या ताब्यात दिले. नांदेड सिटी पोलिसांनी त्याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

# पुण्यात ४० कोटींचा आरोग्य घोटाळा

## महापालिकेची भव्य इमारत खासगी रूग्णालयासाठी कुरण

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : महापालिकेने ४० कोटी रुपये खर्चून बाणेर येथे उभारलेली भव्य इमारत आता एका खासगी रुग्णालयासाठी कुरण ठरत आहे. या रुग्णांच्या लुटीचा पाढा खुद्द महापालिका सभागृहात वाचूनही, महापालिकेकडून अद्याप कारवाई झालेली नाही.

बाणेर येथील सर्व्हे क्रमांक ३३ मध्ये महापालिकेने ४० कोटी रुपये खर्च करून २५ हजार चौरस फुटांची अद्ययावत इमारत उभारली. कोरोना काळात येथे कोट्यवधीची यंत्रसामग्रीही खरेदी करण्यात आली. मात्र, ही सर्व मालमत्ता ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर एका फाऊंडेशनला हॉस्पिटल चालवण्यासाठी दिली. महापालिकेच्या नियमानुसार कोणतीही मालमत्ता विनाभाडे देता येत नाही, तरीही हा मेहेरबान निर्णय घेण्यात आल्याचा गंभीर आरोप नगरसेवक अमोल बालवडकर यांनी सभागृहात केला होता.

ज्या संस्थेला ही इमारत देण्यात



आली, तिची धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे साधी नोंदही नसल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या सुविधा वापरून हे रुग्णालय चालवले जात असताना, सर्वसामान्य पुणेकर रुग्णांना मात्र तिथे अत्यल्प दरात उपचार मिळत नाहीत. इतकेच नव्हे, तर राज्य सरकारच्या लोकोपयोगी आरोग्य योजनांनाही या रुग्णालयाने केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप बालवडकर यांनी केला.

सभागृहात हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर महापौरांनी आणि आयुक्तांनी सखोल चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, महिना उलटून गेल्यानंतरही आरोग्य विभागाने केवळ नोटिशीचा सोपस्कार पार पाडण्यापलीकडे काहीही केलेले नाही. याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. नीना बोराडे म्हणाल्या, बाणेर येथील महापालिकेच्या इमारतीत सुरू असलेल्या रुग्णालयास नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांची चौकशी केली जाईल, त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

# अग्रलेख : पश्चिम बंगालनंतर भाजपचे 'मिशन पंजाब'

पश्चिम बंगाल काबिज केल्यानंतर आता भाजपने पंजाबमध्येही सत्ता मिळवण्यासाठी भाजपने रणनीती आखली आहे. पुढील वर्षी होणाऱ्या पंजाब विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली असून, त्यासाठी विशेष मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रिया सुरू केली जात आहे. सन २०२७ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूरसोबत पंजाबमध्येही विधानसभा निवडणुका होतील, असं दिसतं. भाजपच्या मुख्यालयात त्यामुळे या राज्यांतल्या नेत्यांची वर्दळ वाढलीय. उत्तर प्रदेशात भाजपला चिंता करण्यासारखी परिस्थिती सध्या तरी नाही. त्यामुळेच कदाचित भाजप नेतृत्वाचं विशेष लक्ष पंजाबकडं आहे.

पश्चिम बंगाल, पंजाबसारखं सीमावर्ती राज्य अधिपत्याखाली आणणं हे भाजपला आवश्यक वाटत असणार. मागच्या विधानसभा निवडणुका, २०२४ची लोकसभा निवडणूक आणि पोटनिवडणूक यांत पंजाबात भाजपला यश मिळवता आलं नाही. मात्र यश मिळालं नाही म्हणून प्रयत्न सोडून देणाऱ्यांतला सध्याचा भाजप नाही. बंगालपेक्षा जास्त संवेदनशील असलेल्या पंजाबसारख्या राज्यांत सत्तेचा कलश हाती ठेवण्यासाठी भाजपनं आपली एकेक शस्त्रं धारदार करण्यास सुरुवात केली आहे. विशेष मतदारयादी पुनरावलोकन (एसआयआर) ही वादग्रस्त प्रक्रिया पंजाबातही सुरू होत आहेच.

भाजप २०२७ च्या पंजाब विधानसभेच्या सर्व ११७ जागांवर निवडणूक लढवील, असं पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी सांगितलं, पण सत्तेत येण्यासाठी मार्ग कोणताही चालेल, असंच धोरण आहे. इतर राज्यांप्रमाणेच पंजाबातही भाजपनं इतर पक्षांमधले नाराज प्रमुख नेते आपल्याकडे ओढण्यास सुरुवात केली आहे. मागच्याच महिन्यात 'आप'चे राज्यसभेतले सात खासदार आणि इतर ज्येष्ठ नेते भाजपमध्ये सामील झाले. त्यातील राघव चड्ढा यांना पंजाबच्या पुढच्या मुख्यमंत्रिपदाची स्वप्नं पडू लागल्याचं सांगितलं जातं. बंगाल, आसाम, बिहारमध्ये भाजपनं आयारामांना मुख्यमंत्रिपदाचा मुकुट सोपवला हे पाहता चड्ढा यांची कथित महत्त्वाकांक्षा अगदीच स्वप्नवत नसणार.

दुसरीकडं पंजाबातही ईडी आणि 'सीबीआय'सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप मुख्यमंत्री भगवंत मान यांनी थेट राष्ट्रपतींच्या दरबारापर्यंत पोहोचवला; पण दिल्लीत आलेले मान यांचा चेहरा भर दुपारीही जसा ध्यानमग्न दिसत होता, ते पाहता स्वतः केजरीवाल यांनाच पंजाबात प्रचारात मध्यवर्ती भूमिका करणं अपरिहार्य ठरेल. सोशल मीडियावरची प्रसिद्धी आणि राजकीय डावपेचांत पारंगत होत चाललेले चड्ढा आणि सांख्यिकी साधनांच्या माध्यमातून तळागाळातील संघटना उभारण्यात अनुभवी असलेले संदीप पाठक यांची २०२२ च्या पंजाब निवडणुकीतील आपच्या विजयात मोठी भूमिका होती. चड्ढा-पाठक यांनी राज्यसभेत 'आप'ला खिंडार पाडलं त्याच सुमारास त्यांच्या एका जवळच्या सहकाऱ्यानं पंजाबमधील 'आप'च्या नेत्यांना फोन करण्याचा सपाटा लावून एक प्रस्ताव मांडायला सुरुवात केल्याचं वृत्त आहे. पाठक 'आप'च्या नेत्यांना व आमदारांना वैयक्तिकरीत्या ओळखतात व त्यांनी त्यांना मार्गदर्शनही केले आहे. मग प्रसंगी आपल्या या मार्गदर्शकाची आज्ञा पंजाबतले आप आमदार कशी टाळणार, असा सवाल राजकीय वर्तुळात असून, त्यात तथ्यही आहे.

अर्थात सहा वर्षांनंतर भाजप व शिरोमणी अकाली दल पुन्हा एकत्र येतील का? भाजप पंजाबमध्ये आपली संघटना मजबूत करून शहरी मतदारांबरोबरच दलित, ओबीसी व तरुण मतदारांतही आधार वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. पंजाबात भाजपला स्वतंत्रपणे सत्ता मिळवण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. अकाली दल किंवा इतर प्रादेशिक शक्तींशी युती करायची की नाही, हा निर्णय अखेरीस केंद्रीय नेतृत्वाच्याच हातात असेल. भाजपनं पंजाब सर करणं याला बंगालमध्ये वाढलेल्या प्रभावाइतकंच वेगळं महत्त्व असेल. साहजिकच भाजपचं 'मिशन पंजाब' आता अधिक वेगानं पुढं सरकत आहे. पंजाब जिंकणं अवघड असलं तरी अशक्य नाही, हे भाजपला स्थानिक स्वराज्य संस्था व शहरी भागांतील वाढत्या प्रभावातून दिसू लागलंय. त्यामुळेच भाजप नेतृत्वानं भविष्यात विनोद तावडे, तरुण चुघ या संघटनात्मक नेत्यांना पंजाबात सक्रिय भूमिका दिल्यास आश्चर्य नाही.

बिहारच्या नव्या सम्राट चौधरी मंत्रिमंडळातील ३१ पैकी जवळपास ४८ टक्के मंत्र्यांवर गुन्हे दाखल असून, त्यापैकी २९ टक्के मंत्र्यांवर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. ९० टक्के मंत्री कोट्यधीश आहेत आणि त्यांच्याकडील मालमत्ता प्रत्येकी सरासरी साडेसहा कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. सध्याच्या भाजपला यात गैर वाटत नाही. राजकारणात कोणी भजन-कीर्तन करायला आलेलं नसतं, हे नितीन गडकरींसारख्या भाजपमधील ज्येष्ठांचं सत्यकथन लक्षात घेतलं तर फक्त निवडणुका जिंकण्यासाठी भाजप वाट्टेल ते करतं. असा दुटप्पीपणा काँग्रेससह विरोधक किती काळ करणार आणि तो जनतेला कळत नसेल असा शहामृगी पवित्राही किती काळ घेणार हे प्रश्न उपस्थित होणंही स्वाभाविक. असं करून अपेक्षित काही साध्य होत नाही हे लक्षात येऊनही विरोधकांना जाग कशी येत नाही? एकच चूक पुन:पुन्हा केली की ती गुन्हा ठरते हा सर्वमान्य सिद्धान्त राजकारणाला लागू होत नाही असे कसे होईल?

## अंतरंग



### निसर्गनिर्भर काटकसरची कसरत

एकीकडे पंतप्रधानांनी अनेक गोष्टींबाबत काटकसर करण्याचे आवाहन केले आणि देशभरात एकच खळबळ उडाली. अर्थात यापूर्वीच्या पंतप्रधानांनीसुद्धा त्या त्यावेळची परिस्थिती पाहून काटकसरीचे आवाहन केले होते. अगदी व्यक्तीगत स्तरावरसुद्धा त्या-त्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती त्याच्या उत्पन्नाची साधने त्याला मिळणारी मिळकत या सर्वांचा अंदाज घेऊन तोदेखील काटकसर किंवा आपल्या खर्चाचे निर्णय करत असतो. परिस्थितीच माणसाला, समाजाला आणि अगदी देशालासुद्धा काही निर्णय घ्यायला भाग पाडते. आता देशपातळीवर तशीच काहीशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पंतप्रधानांनी आवाहन केलेले आहे. आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीचा अंदाज घेऊन जसे हे निर्णय घेतले जातात. तसेच एकूणच नैसर्गिक वातावरण, परिस्थिती आणि संभाव्य बदल लक्षात घेऊन शासकीय यंत्रणांना निर्णय घ्यावे लागतात. सध्या देशभरात कडाक्याचा उन्हाळा आहे. तापमानात गेल्यावर्षीच्या तुलनेत मोठी वाढ होते आहे. अगदी आपल्या महाराष्ट्रात दरवर्षी विदर्भ, मराठवाडा, खानदेश हा परिसर वैशाख वणव्याने अक्षरशः होरपळून निघतो तर दमट हवामानाच्या परिणामातून मुंबई, ठाणे, रायगड, कोकण किनारपट्टी घामाने डबडवून जाते. मात्र यावेळी मुंबईतसुद्धा तापमानाचा पारा चाळीसच्या आसपास येऊन ठेपला आहे. त्या सगळ्या तापमानाचे अंदाज घेऊन सावधानतेच्या सूचनाही दिल्या गेल्या आहेत. राज्याच्या अनेक भागात पाणीटंचाईचे संकट उभे ठाकले आहे. मुंबई, ठाणे, जिल्ह्यांसाठी असलेला पाणीसाठा कडक उन्हामुळे वेगाने कमी होतो आहे. मुंबई, ठाणेसह इतर भागात दहा टक्के पाणीकपात लागू झालेली आहे. म्हणजे आता निसगनिच ही काटकसर लादून सावधान राहाण्याचा इशाराच केलेला आहे. परिस्थिती ज्या पद्धतीने काटकसर किंवा सावधगिरीच्या उपाययोजना करायला जशी भाग पाडते त्याचे हे ताजे उदाहरण म्हणता येईल. वेधशाळांच्या अंदाजांप्रमाणे पुढचा आठवडाभर तापमानाची तीच परिस्थिती कायम राहाणार आहे. याचा अर्थ पाणी टंचाईचे संकट अधिक वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सृष्टीचे दैनंदिन चक्र हे सृष्टीतच उपलब्ध होणाऱ्या वेगवेगळ्या स्त्रोतांवर अवलंबून असते. सुदैवाने भारतासारख्या समान ऋत्चक्र असलेल्या देशात पाण्यापासून ते वीज किंवा अन्य प्रकारच्या इंधनापर्यंत निसर्गनिर्मित व्यवस्था उपलब्ध होऊ शकतात. आज ज्या पद्धतीचे इंधन मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. त्यात पेट्रोल-डिझेल किंवा नैसर्गिक वायू असेल. या गोष्टी भूगर्भातूनच उपलब्ध होतात. भारताबाहेरच्या अनेक देशांमध्ये हे इंधन साठे मुबलक जरी असले तरी सगळ्या जगाला पुरून उरेल. एवढा इंधनसाठा नसतो. म्हणूनच अनेक देशांमध्ये अत्यंत महागड्या किमतीने इंधन विकत घेण्याची वेळ येते. भारताला या इंधनसाठ्याची करावी लागणारी व्यवस्था प्रचंड खर्चिक झालेली आहे. अमेरिका, इराण युद्धानंतर आपल्या इंधनसाठ्याच्या पुरवठ्यावर परिणाम होतो आहे. आणि हे इंधन मिळवण्याकरीता तितकीच ज्यादा किंमतही मोजावी लागते आहे. ती परिस्थिती खूप काळ खेचून नेता येणे शक्य नसल्याने पंतप्रधानांना काटकसरीच्या सूचना कराव्या लागल्या. म्हणजे परिस्थितीनेच काटकसर करायला भाग पाडले आहे. सध्या जगभर वाढत जाणारे तापमान केवळ उष्णता निर्माण करते आहे असे नाही तर भूगर्भातील जलसाठे कमी होत आहेत. शिवाय उष्णतेमुळेच जंगलांना लागणाऱ्या आगींचे प्रमाण वाढते आहे. त्यामधून दैनंदिन गरजेसाठी लागणाऱ्या ऊर्जेवरही परिणाम होतो आहे. एकीकडे ऊर्जेची मागणी वाढत आहे. तर दुसरीकडे नैसर्गिकरित्या उपलब्ध करून देणारे स्रोत कमी होत चालले आहेत. पाणी, कोळसा यांच्यावरही परिणाम होत असल्याने ऊर्जेची बचत किंवा काटकसर भविष्यकाळासाठी तितकीच महत्त्वाची ठरते, विज्ञान, तंत्रज्ञानाचे अनेक प्रकारचे अप्रत्यक्ष परिणाम जगातल्या सगळ्याच देशांना जाणवत आहेत. प्रचंड वेगाने होत असलेले औद्योगीकरण शहरांची वाढ म्हणजेच नागरीकरण, वाढत्या लोकसंख्येला अपुऱ्या पडणाऱ्या साधनसुविधा या गोष्टीदेखील निसर्गनिर्मित परिस्थितीचाच अनिवार्य भाग ठरतो. भविष्यकाळातल्या संभाव्य टंचाईची जाणीव ठेवून आतापासूनच काही सावधगिरीच्या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरतात.

संपूर्ण सृष्टीवर ७० टक्के पाणीसाठा असताना चांगले आणि पुरेसे पिण्याचे पाणी मिळू शकत नाही. हा निसर्गाचाच आश्चर्यकारक प्रकार ठरतो. विज्ञान, तंत्रज्ञान इतके पुढे गेले असतानाही कोणत्याही देशाने शंभर टक्के समुद्राच्या पाण्याचे गोड पाण्यात रुपांतर करू शकलेले नाही. तिथेसुद्धा निसर्गनिर्मित या परिस्थितीपुढे मनुष्य किंवा विज्ञानदेखील हतबल होऊन जाते. म्हणूनच आजुबाजूला प्रचंड पाणीसाठा असताना पिण्याचे पाणी काटकसरीनेच वापरण्याची वेळ येते. एकूणच सृष्टीचक्र किंवा समाजजीवनाचा विचार करता स्वावलंबी किंवा पूर्ण आत्मनिर्भर होऊ शकत नाही. त्याला निसर्गनिर्भरच राहावे लागते आणि या निसर्ग निर्भर काटकसरीची कसरतही करावी लागते. जर अन्य नैसर्गिक स्रोतांबाबत ही परिस्थिती असेल तर मनुष्यनिर्मित अनेक गोष्टींबाबत सावधानता बाळगणे आणि आहे त्याच साधनसुविधांचा मर्यादित वापर करणे असा एकच पर्याय शिल्लक राहातो. बदलत्या काळाची बदलती पावले ओळखण्याचा समंजसपणा किंवा दूरदृष्टी दाखवता आली पाहिजे. पाण्याच्या वापरापासून दूरदृष्टी दाखवता आली पाहिजे, पाण्याच्या वापरापासून ते सोन्याच्या किमतींपर्यंत सर्वांचेच स्थान अमूल्य आहे. कुठेही निसर्गाचे शोषण होणार नाही पण मनुष्यजीवनाचे योग्य पद्धतीने भरणपोषण होत राहील याची जाणीव खूप महत्त्वाची ठरते. दुर्दैवाने हे भान ठेवले जात नाही. अनेक गोष्टी वाया घालवल्या जातात. जगभरात रोज सत्तर लाख टन अन्नधान्य वाया जात असते. योग्य ती काळजी न घेतल्याने धान्याची होणारी नासाडी या सगळ्याच बाबी समाजाला लागलेल्या अनिष्ट सवयीच ठरतात. त्यामध्ये काळानुसार सुधारणा करणे गरजेचे ठरते.

– माधवी सावंत

# पार्थच्या मुख्यमंत्री भेटीने तर्कवितर्कांना उधाण

## राजकारण



गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या नाराजीनाट्याच्या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्री आणखी एक नवीन घडामोड घडताना दिसली. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आणि सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी शनिवारी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. कोणालाही सुगावा लागू न देता पार्थ पवार हे शनिवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर पोहोचले. याठिकाणी दोन्ही नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली आणि भेटीचे नेमके प्रयोजन, याचा तपशील अद्याप गुलदस्त्यात आहे.

सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सुरु असलेल्या अंतर्गत वादाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी पक्ष संघटनेत कमालीचे सक्रिय झालेले पार्थ पवार हे काल एकटेच देवेंद्र फडणवीस यांना भेटायला गेले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून वगळल्याची बाब समोर आल्यानंतर या सगळ्या नाराजीनाट्याला सुरुवात झाली होती.

प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांचे नाव निवडणूक आयोगाला पाठवलेल्या कार्यकारिणीच्या यादीत नसणे, ही प्रिंटिंग मिस्टेक असल्याचे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेसकडून देण्यात आले होते. निवडणूक आयोगाला नव्या पदाधिकाऱ्यांच्या यादीबाबत पत्र लवकरच पाठवले जाईल, असेही राष्ट्रवादीकडून सांगण्यात आले आहे. मात्र, ही खरोखरच प्रिंटिंग मिस्टेक होती की सुनेत्रा पवार यांनी सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांना दिलेला अप्रत्यक्ष संदेश होता, याविषयी राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत.

पार्थ पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात काही नवीन घडामोडी घडणार का, हे बघावे लागेल. एकीकडे प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना पक्षात साईडलाईन केल्याची चर्चा सुरु असताना सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी या सगळ्याबाबत चकार शब्द काढलेला नाही. तर दुसरीकडे आमदार रोहित पवार हे जवळपास दररोज प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर शाब्दिक हल्ले चढवत आहेत.

अजित पवार यांनी शेवटच्या चार महिन्यांमध्ये माझ्याशी बोलताना अनेकदा प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती, असा दावा रोहित पवार यांनी केला होता. याशिवाय, तटकरे आणि प्रफुल पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील २२ आमदारांना घेऊन भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत असल्याचा सनसनाटी आरोपही रोहित पवार यांनी केला होता.

**भेटीमागून भेटी कारण गुलदस्त्यातच...**

तटकरे आणि प्रफुल पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील २२ आमदारांना घेऊन भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत असल्याचा सनसनाटी आरोपही रोहित पवार यांनी केला होता. याच पार्श्वभूमीवर सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवार यांची भेट घेतली होती. आता पार्थ पवार यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने राष्ट्रवादीत सर्वच ठिकठाक असल्याचे सध्यातरी दिसून येत नाही.

या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवार यांची भेट घेतली होती. यावेळी तिघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, हे माहिती नाही. परंतु, या बैठकीनंतर शरद पवार यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. त्यामध्ये शरद पवार यांनी सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांचा अनुभव कसा मोठा आहे, हे सांगत एकप्रकारे त्यांचे कौतुक केले होते.

यानंतर दुसऱ्याच दिवशी सुनेत्रा पवार यांचे निकटवर्तीय असणारे प्रमोद हिंदुराव यांनी प्रफुल पटेल यांची भेट घेतली होती. मात्र, या सगळ्यानंतरही नाराजीनाट्याचा शेवट झाला नव्हता. अशातच आता पार्थ पवार यांनी फडणवीस यांची भेट घेतल्याने आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात पुढे काय घडणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ अधिक ज्येष्ठ शके संवत्- १९४८ संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- अधिक ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म शुक्ल पक्ष तिथि:द्वितीया १७:५३:२१ नक्षत्र:रोहिणी ११:३१:४० योग:सुकर्मा २१:४७:२० करण:बालव ०७:४६:१३ करण:कौलव १७:५३:२१ करण:तैतिल २८:०३:४४+ सूर्य:वृषभ चन्द्र:मिथुन२२:०४:३४ हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - जिल्हेज तारीख - १ विशेष- धनिष्ठानवक समाप्ती सकाळी ११.३२ मुस्लिम जिल्हेज मासारंभ.

## राशी भविष्य...

**मेष** – शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम कामकाजाची गती मध्यम राहील. लहान-मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल. थकीत पैसे मिळण्यास अडथळे येतील

**वृषभ** – शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण. कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल. उद्योगधंदा चांगला चालेल. जमीन, वाहन, यंत्र इत्यादीपासून लाभ होऊ शकेल.

**मिथून** – शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम. सामाजिक कार्यांमुळे सुयश-सन्मान मिळू शकेल. मित्रांच्या सहकार्याने कामे पूर्ण होतील. उद्योगधंदा चांगला चालेल.वैवाहिक जीवनात भावनात्मक समस्या.

**कर्क** – शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण. बुद्धि आणि मनोबलाने सुख-संपन्नतेची परिस्थिती बनेल.आळस सोडून द्या. कायदेशीर प्रकरणे सुधारतील. उद्योगधंदा फायदेशीर राहिल.

**सिंह** – शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व. नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात. आर्थिक परिस्थितीत सुधार होण्याची शक्यता आहे. व्यवसायात प्रगती होईल.

**कन्या** – शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पूर्व. मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.योजनेनूसार कामे केल्यास लाभ होऊ शकेल. जेवणाच्या अनियमितपणा पासून वाचा.

**तूळ** – शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व. विचार करुन कामे केल्यास परिस्थिती सुदृढ बनवू शकेल. आपल्या कामांची लोकप्रशंसा करतील. आई-वडिलांशी संबंध घनिष्ट होतील. व्यर्थ भास होतील.

**वृश्चिक** – शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम. कुटूंबाच्या सहकार्याने दिवस उत्साहपूर्ण जाईल. थकीत पैसे मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. जास्तीचे डोके लावण्याची कामे करु नका.

**धनू** – शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण. योजनेनुसार कामे केल्यास फायदा होईल. मान-सन्मान वाढेल.कौटूंबिक जबाबदाऱ्या पार पाडू शकाल. पराक्रम क्षमता राखल्याने कठीण कामेही पूर्ण होतील.

**मकर** – शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम. दूरदर्शिपणाने आणि बुद्धिचातुर्याने समस्या दूर होतील. अवडंबरांपासून दूर रहा. रोजगार, धंद्यात कमाईचे योग आहे.खर्च हिताचा राहिल.

**कुंभ** – शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व. प्रत्येक कामात सावधगिरी बाळगा. वातावरण अनुकूल असूनही कामे होऊ शकणार नाही. खर्च विचार करून करा.

**मीन** – शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम. प्रसन्नता आणि आशादायी वातावरणामुळे प्रयत्न सार्थक होतील. आजीविकेत परिवर्तन किंवा नवीन संधी फायदेशीर राहतील.प्रवास कष्टदायी.

## पारावरचा फड



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्धजन्य परिस्थितीच्या तोंडावर इंधनबचावचा संदेश दिला. स्वत:च्या ताफ्यातील वाहनात कपात करताच राज्यभरात त्याचा गवगवा झाला, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह अनेकजण दिखाव्यापुरते दुचाकीवरही आले. रोडकरी गडकरी वारकरी मार्गाची पाहणी करण्यासाठी लालपरीत बसले म्हणे, परंतु त्यांच्यामागे ४० हून अधिक वाहनांचा ताफा चर्चेचा विषय ठरला. काहीजण तर बैलगाडीतही बसले आणि त्याचे रिल्सही गाजले. अर्थात हे सांगण्यापुरते झाले तरी रोजच्या कार्यबाहुल्यात हे शक्य नाही हे जनताही जाणते. कारण गतिमान कारभार आणि प्रगती साधण्यासाठी वेगावर स्वार व्हावे लागणार, त्यासाठी इंधनखर्च होणारच. त्याला आवर म्हणजे प्रगतीला आवर आणि मंदीच्या दिशेने वाटचाल हे स्पष्ट आहे. यासंदर्भात पारावरची चर्चा!

**बाबूराव :** इराण-इसरायल, आमेरिकेच्या वादात म्हनं इंधनकोंडी झालीया, जगभरात आता हालकल्लुळ सुरु हाय. त्येचाच भाग म्हनून मोदीसायबानं खबरदारीसाटी इंदान वाचवा म्हनू सांगिटलंया.

**पांडूनाना :** व्हय, त्येनी तापा कमी करताच समदी त्याची री वडाय लागलीया की.

**बाबूराव :** आरं ते दिकाव्यापुरतंच. देवाभाऊ बुलटवं बसलं पर तेवड्यापुरतंच. समदीकडं हेच चालू हाय.

**पांडूनाना :** तुमा लोकास्नी चालत फिरा म्हटल्यावं पटतंया का, मंतरी-संतरी उलटं इचाराय लागल्याती.

**बाबूराव :** आरं हे आमास्नी नगं, मोदीस्नी इचारा म्हनावं. आन् परदेशात ह्यापरास वंगाळ हाय म्हनत समदी म्हागाई वाडवाय लागल्याती. तसं कुटंच न्हाय.

**पांडूनाना :** राजानं मारलं तर कुनास्नी इचारायचं?

**बाबूराव :** म्हनूनच म्हंतुया, समदी ढोंगं बंद करा, लोकास्नी बी गाड्यावं फिरु द्या आन् तुमी बी फिरा.

**पांडूनाना :** तसं कसं, मोदीसायबानं सांगिटलं म्हटलं म्हनून समदीकडं परचार सुरु झालाया जोरात.

**बाबूराव :** पर म्या म्हंतुया, खतं, बी-बियानं, गॅस, पेटरोल समदं म्हागाय लागलंया त्येचं काय?

**पांडूनाना :** त्याकरताच बचत करा म्हनून सांगत्याती.

**बाबूराव :** हे म्हजी भाकर न्हाय तर केक खा सारकं?

**पांडूनाना :** आक्शी बराबर हाय बग. आता कांद्याचंच बग न्हवं, रुपड्याला भाव झालाया आन् फडनवीस म्हंत्यात १२ रुपडं ३५ पैकं देतो म्हंत्यात. आरं तेवड्यात तर त्येचा उतपादन खरच भागतुया का?

**बाबूराव :** मॉलमदी गेल्यावं, दुकानात कुटं मोलभाव करत्यात का? मग बळीराजाच्या मालाला मोलभाव का?

**पांडूनाना :** मोलभाव न करायचा कायदाच कराय हावा.

**बाबूराव :** म्या म्हंतु परवडत न्हाय तर शकतीपीट हाय.

**पांडूनाना :** मग शकतीपीटात शेती द्या आन् रिकामं व्हा!

**बाबूराव :** पोटाला बिब्बं खायाचं का!

**पांडूनाना :** मग बरगर पिझ्झा खा!– **अमृत चौगुले**


## उपदेश कथा



**दृढ संकल्प**

कालीदास मंद बुद्धीचा काळा कुरुप व्यक्ती होता. ज्या फांदीवर बसला होता तिलाच कापत होता. जंगलात त्याला या अवस्थेत बसलेले पाहुन राजसभेतून विद्योत्तमाद्वारे अपमानित पंडितांनी त्या पंडितेस शास्त्रात हरवणे व तिच्यासोबत लग्न करण्याचा कट आखण्यासाठी कालीदासला श्रेष्ठ पात्र मानले. शास्त्रात आपल्या कुटीलताने त्यास मौन विद्वान समजून त्यांनी प्रत्येक प्रश्नाचे समाधान अशाप्रकारे केले की विद्योत्तमाने त्या महामूर्खासमोर पराभव कबुल करत त्यास आपला पती स्वीकारले. पहिल्याच दिवशी जेव्हा त्याला वास्तविकता कळाली तेव्हा तिने त्याला घरातून हाकलून लावले. हाकलताना ज्या शब्दात तिने त्याचा अपमान केला, तो त्याच्या जिव्हारी लागला. दृढ संकल्प अर्जित करत तो आपल्या ज्ञान वृद्धी लागला. अखेरीस तोच महामूर्ख आपल्या अध्ययनाने कालांतराने 'महाकवी कालीदास' रुप प्रकट झाला व आपल्या विद्वतेची साधना पूर्ण करून विद्योत्तमासोबत त्याचे पुनर्मिलन झाले.

## दिनविशेष...




१२६८ – मामलुक सुलतान बैबर्सने सिरियातील अँटिओक शहर लुटले. १६५२ – अमेरिकेच्या ऱ्होड आयलंड राज्याने गुलामगिरी बेकायदेशीर ठरवली. १७६५ – कॅनडातील मॉन्ट्रिआल शहरात भीषण आग. १८०३ – युनायटेड किंग्डमने एमियेन्सचा तह झिडकारला व फ्रांसविरुद्ध युद्ध पुकारले. १८०४ – नेपोलियन बोनापार्ट फ्रांसच्या सम्राटपदी. १८६९ – जपानचे एझो प्रजासत्ताक बरखास्त. १८७६ – कॅन्ससच्या डॉज सिटी शहरात वायेट अर्प पोलिसकामात रुजू झाला. १९०० – युनायटेड किंग्डमने टोंगा आपल्या साम्राज्याचा भाग असल्याचे जाहीर केले. १९१७ – अमेरिकन काँग्रेसने नागरिकांना सक्तीने सैन्यात भरती करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला दिला. १९२७ – मिशिगनच्या बाथ शहरात शाळेच्या अधिकाऱ्याने शाळेत ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट. ४५ ठार. १९४१ 'झम् झम्' नावाचे जहाज जर्मन पाणबुडीने बुडविले. इजिप्तच्या या जहाजावर एक हजार प्रवासी होते. ते र्सव बुडाले. त्यात २०० अमेरिकन प्रवासीही होते. १९४४ – दुसरे महायुद्ध-मॉन्टे कॅसिनोची लढाई – उभय पक्षातील २०,००० सैनिकांच्या निधन नंतर जर्मन सैन्याची पीछेहाट.


### नीट पेपर फुटीने कोट्यवधींचा खर्च

नीट परीक्षा नुकतीच तीन मे रोजी पार पडली त्यानंतर त्याचे पेपर्स फुटल्याचे सत्य समोर आले. फुटीचे हे लोन देशभर पसरल्याचे दिसते सरकारी पातळीवर या फुटीची चौकशी चालू आहे त्यातून काही धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. ही परीक्षा घेण्यासाठी यंत्रणेने अनेक गोष्टींचे आयोजन केले होते. पेपर सेट करणे, ते प्रिंट करणे, केंद्राची व्यवस्था करणे, तेथील सुपरवायझर आदी लोक नेमून त्यांचे भत्ते इत्यादी गोष्टींचे नियोजन करणे, पेपर चेक करणे व तो निकाल जाहीर करणे. ही अनंत कामे करावी लागतात. हे सारे नियोजनबद्ध पणे चालू होते. या परीक्षेसाठी तब्बल २२ लाखांवर विद्यार्थी परीक्षेस बसले होते. या परीक्षेसाठी सरकारचा कोट्यवधी रुपयांचा खर्च आला. आता पेपर फुटीची बातमी आली असून त्याची चौकशी देशभर चालू आहे. त्यातून काय निष्कर्ष येतील हा भाग वेगळा. पण सध्या ज्या विद्यार्थ्यांनी नेटाने अभ्यास करून ही परीक्षा दिली त्यांचे सारे श्रम वाया गेले. आता त्या ना पुनः परीक्षा द्यावी लागणार केंद्रावर जावे जगणार. सरकारला या परीक्षेसाठी पुन्हा खर्च करावा लागणार आहे हे सारे आपणास टाळता येणार नाही का ? पेपर सेटिंग करून परीक्षा घेण्यापर्यंत सारे काम व्यवस्थित पणे पार पडता येणार की नाही कारण या परीक्षेवर अनेक विद्यार्थी अवलंबून आहेत. त्वरित चौकशी करून सत्य बाहेर आणा व अशा घटना परत होणार नाहीत याची खात्री व दक्षता घ्या.

## जन की बात...



### पाण्याची बचत : काळाची गरज



राज्यातील तापमानाचा पारा जसा वाढत चालला आहे तसा राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. राज्यातील धरण साठ्यातही सरासरी तीस ते चाळीस टक्केच पाणी साठा शिल्लक आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक आहे. अनेक गावांमध्ये विहिरी आणि बोअरवेल आटल्या आहेत त्यामुळे या गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवला असल्याने पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. अर्थात हे संकट केवळ पावसाच्या कमतरतेमुळे निर्माण झाले असे नाही तर ती नियोजनातील त्रुटी, भूजलाचा अनियंत्रित उपसा, जलस्त्रोतांचे असमान वितरण आणि पाण्याचा अव्यवस्थित वापर या कारणामुळे देखील हे संकट ओढावले आहे. हे संकट आणखी गडद होऊ द्यायचे नसेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन करायला हवे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. नागरिकांनीही पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीर्याने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर ही वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.

### मराठी माध्यमाच्या शाळा निवडा

गेल्या काही वर्षांपासून आपल्या पाल्याला मराठी शाळेत घालायचे की इंग्रजी शाळेत, अशा संभ्रमावस्थेत पालक असतात. वास्तविक इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी शाळेतच विद्यार्थ्यांने शिकले पाहिजे असे नाही. मराठी माध्यमाच्या विशेषतः सरकारी शाळातून शिकलेले अनेकजण आज वेगवेगळ्या क्षेत्रात उच्च पदावर बसलेले आपणास पहावयास मिळतात. खर तर आजही जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या मराठी शाळा दर्जेदार शिक्षण देवुन कात टाकत आहेत. या शाळातून शिक्षण देणारे शिक्षकही डी एड्, बी एड्, एम एड् ,असे उच्च गुणवत्ता असणारे असून ते वेगवेगळ्या नवीन अध्यापन पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत असतात, त्यामुळे आज महाराष्ट्रातील हजारो मराठी शाळा आयएसओ मानांकन प्राप्त केलेल्या आपणास पहावयास मिळतात. जिल्हा परिषद व महापालिका शाळातुनही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू केलेले आहेत गुणवत्तेच्या बाबतीतही त्या इंग्रजी शाळांचे पुढे आहेत. आता तर मराठी शाळातुनही सीबीएसई अभ्यासक्रम शिकविला जात आहे. परंतु तरीही विशेषतः शहरातील पालकांचा ओढा हा मराठी ऐवजी इंग्रजी शाळेकडे असतो निश्चितच ही बाब खेदजनक आहे. एका बाजूला चांगल्या दर्जाचे मोफत शिक्षण देणाऱ्या मराठी माध्यमाच्या शाळा व दुसऱ्या बाजूला पालकांना लाखो रूपये मोजायला लावून शिक्षण देणाऱ्या व पालकांच्या खिशाला कात्री लावणाऱ्या इंग्रजी शाळा, यातील फरक पालकांनी वेळीच जाणून आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळेऐवजी मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करावे व महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या शाळा व मराठी भाषेबाबतचा आपला दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा.



# अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय कर्मचाऱ्यांचा 'महा-संकल्प'

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** देशाचे यशस्वी नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच देशाला संबोधित करताना इंधन बचत, ऊर्जा संवर्धन आणि पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण संदेश दिला. 'चर्ळीाळेप ड्ळत्रए' अर्थात पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी देशवासियांना केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देखील पर्यावरणपूरक उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी आग्रही असून, त्याच प्रेरणेतून अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय



कर्मचाऱ्यांनी 'हरित चळवळी'चा महा-संकल्प केला आहे.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या सामाजिक वारशाला पुढे नेत उपाध्यक्ष अशोक अलका सूर्यभान मासाळ यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेस सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर तसेच अहमदनगर डिस्ट्रिक्ट रेव्हेन्यू (महसूल) डिपार्टमेंट क्लास-३ गव्हर्नमेंट सर्व्हन्ट्स असोसिएशन आणि जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.

'हरित शुक्रवार' उपक्रमातून इंधन बचतीचा संदेश

उपक्रमांतर्गत प्रत्येक शुक्रवारी जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी 'नो व्हेईकल डे' पाळणार आहेत. कर्मचाऱ्यांनी स्वतःची खाजगी वाहने घरी ठेवून कार्यालयात येण्यासाठी सायकल, एसटी बस, रिक्षा किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. काही कर्मचारी २ ते ३ किलोमीटर अंतर पायी चालत कार्यालयात जाण्याचा संकल्पही करणार आहेत.

# पुणतांबा मार्गावरील नादुरुस्त एसटी बसमुळे प्रवासी त्रस्त; आंदोलनाचा इशारा

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** एस टी महामंडळाच्या कोपरगाव आगाराच्या पुणतांबा मार्गे श्रीरामपूर धावणाऱ्या अनेक नादुरुस्त बस गाड्या मुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून यामध्ये चांगल्या बसेस सोडून गैरसोय दूर करावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेनेचे शहर प्रमुख महेश कुलकर्णी यांनी दिला आहे. कोपरगाव आगाराच्या पुणतांबा मार्गे श्रीरामपूर साठी अनेक बसेस गाड्या सुरू आहेत मात्र या मधील काही गाड्या जुन्या झालेल्या असल्याने काही वेळा रस्त्यातच बंद पडतात खिडक्या तुटलेल्या काचा गळालेल्या यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करून प्रवास करावा लागत आहे. कोपरगाव आगाराच्या या गलथान कारभाराने सर्व सामान्य जनता त्रस्त झाली असुन कोपरगांव एसटी डेपो म्हणजे रामभरोसे असाच म्हणावा लागेल कोपरगांव ते श्रीरामपुर ला ये जा करणार्या बस या पुर्णपणे निकामी झालेल्या आहेत. अशा अवस्थेत वयोवृद्ध नागरिकासह महाविद्यालय विद्यार्थ्यांना जिवावर उदार होऊन प्रवास करावा लागत आहे गेल्या २/३ वर्षात अनेक वेळा संबधित विभागाकडे लेखी निवेदनासह पाठपुरावा करुन चांगल्या अवस्थेत असलेल्या बस उपलब्ध व्हाव्यात म्हणुन मागण्या करण्यात येत आहे, परंतु या मागणी कडे संबंधित विभाग अधिकारी, मंत्री महोदय, स्थानिक लोकप्रतिनिधि यांनी साधी दखल घेतलेली नसुन याबाबत कोपरगाव आगाराने तातडीने दाखल घेऊन या मार्गावर चांगल्या बस गाड्या सोडाव्या अन्यथा शिवसेनेच्या वतीने महाविद्यालय विद्यार्थ्यांसह आंदोलन करण्यात येईल असा इशारा कुलकर्णी यांनी दिला आहे.

# डॉ.कमलेश आर्या यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**सणसवाडी :** शिक्रापूर, ता. शिरूर येथील समाजसेवक डॉ.कमलेश आर्या यांना स्विफ्ट अँड लिफ्ट मीडिया ग्रुप वतीने ग्रुपचे सी. ई.ओ. निलेश साबे यांच्या हस्ते राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ एमईएस ओ डो टोरियम, पुणे याठिकाणी प्रदान करण्यात आला. पुरस्कारर्थींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कमलेश आर्या यांनी सणसवाडी येथे १९९९ साली सेंट कृष्णा स्कुलची सुरुवात केली होती. या शाळेचे अनेक



शाखा सुरु केल्या असून अनेक गुणवंत विद्यार्थी घडवले आहे. भ्रष्टाचार, अत्याचार, शोषण विरुद्ध जन आंदोलन तसेच २०११ मध्ये जंतर मंतर नवी दिल्ली येथे पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या जन लोकपाल आंदोलनात सहभाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नवनाथ येवले, बाबासाहेब दिघे तसेच जयश्री तायडे उपस्थित होते.


# बहिणीचा हक्क नाकारण्यासाठी सख्ख्या भावाची धडपड; दौंड न्यायालयाने दिला मोठा झटका

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** दौंड तालुक्यातील प्रसिद्ध श्रद्धास्थान असलेल्या बोरमलनाथ देवस्थानच्या पुजारी कुटुंबातील जमिनीचा वाद आता चव्हाट्यावर आला आहे. सख्ख्या बहिणीला वडिलोपार्जित वहिवाटीच्या हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी भावाने केलेली धडपड दौंड न्यायालयाने हाणून पाडली आहे. भावाने दाखल केलेला दिवाणी संकीर्ण अर्ज न्यायालयाने फेटाळून लावत बहिणीला मोठा दिलासा दिला आहे.

बोरमलनाथ देवस्थानच्या जमिनीच्या वहिवाटीवरून एकाच पुजारी कुटुंबातील भाऊ आणि बहिणीमध्ये गेल्या काही काळापासून कायदेशीर वाद सुरू आहे. ही जमीन देवस्थान इनाम प्रकारात मोडते. या जमिनीवर आपला हक्क सांगत बहिणीने कायदेशीर प्रक्रिया सुरू केली होती.

मात्र, बहिणीला या हक्कापासून दूर ठेवण्यासाठी भावाने कोर्टात धाव घेतली होती. "ही मालमत्ता देवस्थानची (ट्रस्टची) असल्याने या प्रकरणात कोणताही दिलासा देण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला नाही," असा युक्तिवाद करत भावाने दिवाणी संकीर्ण अर्ज क्र. ३२/२०२५ (ऑर्डर ७ रूल ११ अंतर्गत) दाखल



केला होता. बहिणीचा कायदेशीर मार्ग रोखण्याचा भावाचा हा मुख्य प्रयत्न होता. या प्रकरणावर दौंडच्या संयुक्त दिवाणी न्यायाधीशांसमोर अंतिम सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने भावाचा अर्ज थेट फेटाळून लावला. न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले की, "हा अर्ज केवळ 'वारसा प्रमाणपत्रासाठी' आहे. वारसा प्रमाणपत्र हे केवळ नोंदणीच्या उद्देशासाठी असते, त्याद्वारे मालमत्तेचा थेट मालकी हक्क निश्चित होत नाही. त्यामुळे या टप्प्यावर बहिणीचा अर्ज फेटाळता येणार नाही." न्यायालयाच्या या ७ मे २०२६ रोजी झालेल्या निर्णयामुळे भावाचा बहिणीला अडवण्याचा प्रयत्न अपयशी ठरला असून, बहिणीच्या नोंदणी प्रक्रियेतील मोठा अडथळा दूर

"देवस्थानची इनाम जमीन ही कुटुंबाच्या उपजीविकेसाठी असते आणि त्यात कुटुंबातील महिला सदस्यांनाही समान हक्क मिळायला हवा," अशी चर्चा आता या निर्णयाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

झाला आहे. बोरमलनाथ देवस्थान हे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देवतेची सेवा करणाऱ्या पुजारी कुटुंबातच पैशांसाठी आणि जमिनीसाठी सख्ख्या बहिणीवर अन्याय करण्याचा प्रयत्न झाल्याने स्थानिक परिसरात संताप व्यक्त होत आहे.

# भीमा-पाटस कारखान्याचा २५ वर्षांचा कारभार कर्नाटकच्या कंपनीच्या दावणीला?

## करारापूर्वीची ५१३ कोटींची देणी भीमा-पाटसच्या माथी; तर कारखान्याची विक्री करण्याचा अधिकार कर्नाटकच्या कंपनीला

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** सहकारी चळवळीचा एकेकाळचा कणा असलेल्या आणि दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांची कामधेनु मानल्या गेलेल्या 'भीमा सहकारी साखर कारखान्या'बाबत एक अत्यंत खळबळजनक आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. भीमा-पाटस कारखाना २५ वर्षांच्या लीजवर चालवायला घेणाऱ्या कर्नाटकच्या 'मेसर्स श्री साईप्रिया शुगर्स लिमिटेड' आणि भीमा-पाटस कारखान्याचे अध्यक्ष राहुल कुल यांच्यात झालेल्या गुप्त अटींच्या 'नुकसानभरपाई कराराची' अत्यंत कडक आणि कारखान्याला धोक्यात आणणारी अधिकृत कागदपत्रे आता चव्हाट्यावर आली आहेत. या करारामुळे भीमा-पाटस कारखाना आणि पर्यायाने तालुक्यातील सभासद शेतकरी पूर्णपणे कर्नाटकच्या खाजगी कंपनीच्या दावणीला बांधले गेल्याचे स्पष्ट होत आहे.

बँकेच्या कर्ज थकबाकीमुळे जप्त झालेला भीमा-पाटस कारखाना २५ वर्षांच्या लीजवर चालवण्यासाठी कर्नाटकच्या 'साईप्रिया शुगर्स'ने घेतला. मात्र, हा कारखाना चालवायला घेताना दोन्ही पक्षांमध्ये १९ ऑक्टोबर २०२२ रोजी एक अत्यंत 'एकतर्फी' वाटणारा करार करण्यात आला. या करारातील अटी वाचून सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांनीही डोक्याला हात लावला आहे. या करारातील कलम २ आणि ३ नुसार, लीजपूर्वीची अब्जावधींची (५१३ कोटी रुपये) सर्व देणीज्यात शेतकऱ्यांची उसाची थकीत बिले, कामगारांचे रखडलेले पगार, पीएफ आणि जीएसटी, एक्साईज सारखे कोट्यवधींचे सरकारी कर समाविष्ट आहेतती फेडण्याची संपूर्ण जबाबदारी भीमा-पाटस कारखान्याचीच राहणार आहे. या संपूर्ण थकबाकीशी कर्नाटकच्या 'साईप्रिया शुगर्स' कंपनीचा काडीचाही संबंध असणार नाही, असे करारात स्पष्ट लिहून घेण्यात आले आहे. म्हणजेच, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या घामातून उभा राहिलेला हा कारखाना खाजगी




कंपनी थाटात चालवणार, त्यातून मिळणारा कोट्यवधींचा नफा स्वतःच्या खिशात घालणार आणि जुन्या कर्जांचा व थकबाकीचा अजस्त्र डोंगर मात्र भीमा-पाटसच्या आणि पर्यायाने दौंडच्या शेतकऱ्यांच्या माथी मारून स्वतः नामानिराळी होणार, असा हा अत्यंत एकतर्फी आणि संतापजनक डाव या बातमीच्या माध्यमातून चव्हाट्यावर आला आहे. करारातील कलम ५ आणि ६ अत्यंत आक्रमक आणि भीमा-पाटसला कोंडीत पकडणारे आहेत. कारखान्याच्या कामकाजात, उत्पादनात किंवा ताबा मिळवण्यात जुन्या वादामुळे किंवा राजकीय आंदोलनामुळे कोणताही अडथळा आला, तर त्यामुळे होणाऱ्या सर्व आर्थिक नुकसानीची भरपाई भीमा-पाटस कारखान्याला अवघ्या ९० दिवसांच्या आत साईप्रिया शुगर्सला करावी लागेल. ही भरपाई न केल्यास कारखान्याची जमीन, प्लांट आणि संपूर्ण मशिनरीवर आपोआप साईप्रिया शुगर्सचा मालकी हक्क प्रस्थापित होईल. सर्वात मोठा आणि धक्कादायक धक्का म्हणजे कलम ७ आणि ८. जर भीमा-पाटस कारखान्याने कंपनीला नुकसानभरपाई दिली नाही, तर थेट भीमा-पाटस कारखान्याची मालमत्ता आणि जमीन कोणत्याही त्रयस्थ कंपनीला विकण्याचा पूर्ण कायदेशीर अधिकार कर्नाटकच्या साईप्रिया शुगर्स कंपनीला देण्यात आला आहे. सहकाराच्या माध्यमातून उभा राहिलेला कारखाना थेट एका खाजगी कंपनीला विकण्याचा अधिकार देण्यामागे नेमके काय राजकारण आहे, असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत. या संपूर्ण करारात भीमा-पाटसचे हात इतके बांधले गेले आहेत की, उद्या काही वाद निर्माण झाला तर भीमा-पाटसला महाराष्ट्रात किंवा मुंबई उच्च न्यायालयातही दाद मागता येणार नाही. कलम २४ नुसार, या करारातील वादांचे निवारण केवळ आणि केवळ मुधोळ (जिल्हा बागलकोट, कर्नाटक) येथील न्यायालयातच होईल. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हक्काचा कारखाना कर्नाटकच्या न्यायालयाच्या कक्षेत नेऊन ठेवण्याचा हा प्रकार संशयास्पद मानला जात आहे. हा करार पूर्णपणे एकतर्फी असून, यामध्ये भीमा-पाटस कारखान्याचे हित पूर्णपणे बाजूला सारून कर्नाटकच्या खाजगी कंपनीला राजाश्रय दिल्यासारख्या अटी लादल्या गेल्या आहेत. "कोणत्याही परिस्थितीत हा करार रद्द करता येणार नाही," अशी अट घालून भीमा-पाटसचे दरवाजे कायमचे बंद करण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच भीमा-पाटस कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून तेथे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत आता हा धक्कादायक करार समोर आल्यामुळे दौंड तालुक्याच्या राजकीय आणि सहकार वर्तुळात प्रचंड भूकंप झाला आहे.

# श्री विजय गव्हाणे यांची शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे राहुरी तालुका तालुका प्रमुख म्हणुन नियुक्ती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** कट्टर शिवसैनीक विजय गव्हाणे यांची आज शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षाचे राहुरी तालुक्याचे प्रभारी तालुका प्रमुख नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र आज जिल्हाप्रमुख श्री राजेंद्र दळवी यांनी श्री विजय गव्हाणे यांना सुपुर्त केले.

विजय गव्हाणे हे १९९३ पासुन शिवसैनीक म्हणुन काम केले असुन त्यांनी शहराध्यक्ष राहुरी कारखाना तसेच देवळाली प्रवरा ३२ गावे तालुकाप्रमुख



म्हणुन काम पाहिले आहे. अंत्यत निष्ठावान, धाडसी तसेच लोकांचे मदतीला धावुन जाणारे व्यक्तीमत्व म्हणुन विजय गव्हाणे यांचा नावलौकिक आहे. त्यांची निष्ठा व काम लक्षात घेवुन त्यांची निवड केल्याचे जिल्हाप्रमुख श्री राजेंद्र दळवी यांनी नमुद करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्री विजय गव्हाणे यांचे निवडीने निष्ठावंताला न्याय मिळाल्याचा भावना शिवसैनीक व्यक्त करत असुन संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे. या निवडीचेवेळी शिवसेनेचे दत्ता कडुपाटील , राहुल चौथे, बाळासाहेब शिंदे, सचिन लाटे विजय कुमावत तसेच सचिन मोरे हे उपस्थित होते. पक्ष बांधणी व पक्षसंघटन मजबुत करुन सर्वसामान्यांच्या मदतीसाठी अहोरात्र काम करण्याचे श्री विजय गव्हाणे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# 'कूलिंग-ऑफ' कालावधी माफ; दाम्पत्याला अवघ्या १८ दिवसांत घटस्फोट, पुणे कौटुंबिक न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** वैवाहिक आयुष्यातील मतभेद टोकाला गेल्यानंतर परस्पर संमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतलेल्या दाम्पत्याला पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. कायद्यानुसार आवश्यक असलेला सहा महिन्यांचा 'कूलिंग-ऑफ' कालावधी माफ करत न्यायालयाने त्याच दिवशी घटस्फोट मंजूर केला. त्यामुळे हे प्रकरण अवघ्या १८ दिवसांत निकाली निघाले असून न्यायालयाच्या या निर्णयाची कायदेवर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे.

सन २०१५ मध्ये विवाहबद्ध झालेल्या या दाम्पत्यामध्ये लग्नानंतर काही काळातच वैचारिक मतभेद निर्माण झाले होते. पत्नी नोकरी करत होती, तर पती व्यवसाय क्षेत्रात कार्यरत होते. कालांतराने दोघांमधील दुरावा वाढत गेला आणि त्यांनी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. गेल्या अनेक वर्षांपासून दोघेही विभक्त राहत होते. दीर्घकाळ वेगळे राहत असताना दोघांनीही आपापसातील वाद मिटवत वैवाहिक नातेसंबंध संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार स्मिता आणि



राकेश (नावे बदललेली) यांनी पुणे येथील कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. या प्रकरणात ॲड. अभयराजे रसाळ, ॲड. वैष्णवी बाळासाहेब काकडे आणि ॲड. प्रमोद गायकवाड यांनी त्यांचे कामकाज पाहिले. सुनावणीदरम्यान पती-पत्नीमध्ये पुन्हा सलोखा होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. दोघेही दीर्घकाळापासून स्वतंत्र राहत असल्याने तसेच वाद मिटविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरल्याने न्यायालयाने 'कूलिंग-ऑफ' कालावधी माफ करण्याचा निर्णय घेतला.

यानंतर माननीय कौटुंबिक न्यायाधीश के. व्ही. ठाकूर यांनी त्याच दिवशी परस्पर संमतीने घटस्फोट मंजूर केला. विशेष परिस्थितीत न्यायालयाला असलेले अधिकार आणि घटस्फोट प्रक्रियेतील कायदेशीर तरतुदी यामुळे पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

# संतुलित खत वापराबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे जनजागृती भित्तीपत्रक प्रकाशित

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून केंद्र शासनाच्या धोरणाला अनुरूप संतुलित खत वापर या विषयावरील जनजागृतीपर भित्तीपत्रक विद्यापीठाने तयार केले असून, ते शेतकरी बांधवांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगाम नियोजन व आढावा बैठकीत या भित्तीपत्रकाचे विमोचन राज्याचे जलसंधारण मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले

या भित्तीपत्रकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे महत्त्व, माती परीक्षण, शाश्वत मृद आरोग्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, जैविक खतांचा वापर, हिरवळीच्या खतांचे फायदे, रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना, विद्राव्य खतांचा वापर, रासायनिक खत वापराची पंचसूत्री, सेंद्रिय खतांचा एकात्मिक वापर, आंतरपीक व पीक फेरपालट यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी आमदार



अमोल खताळ, विठ्ठल लंघे, विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते. तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. रवी आंधळे, डॉ. पंडित खर्डे, डॉ. संजय तोडमल आणि प्रा. अन्सार आत्तार उपस्थित होते. बैठकीत संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी खरीप हंगामासाठी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या बियाणे व जैविक खतांविषयी माहिती दिली. विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मान्यवरांना विद्यापीठाची विविध प्रकाशने भेट दिली. सद्यस्थितीत येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी पिकांसाठी संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करावा, असे आवाहन महात्मा फुले कृषी विद्यापीठाने केले आहे. बैठकीत विद्यापीठाच्या संचालकांनी संतुलित खत वापराबाबत जनजागृतीसाठी या भित्तीपत्रकाचे महत्त्व विशद केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करून कृषी विभागाने ही भित्तीपत्रके गावोगावी प्रदर्शित करण्याच्या सूचना दिल्या.

# नायगाव सोसायटीच्या उपाध्यक्ष पदी काशिनाथ खळदकर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुरंदर :** पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील नायगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित नायगाव या सोसायटीची उपाध्यक्ष पदाची निवडणूक नुकतीच संपन्न झाली.काशिनाथ श्रीपती खळदकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर, संचालक विलास खेसे, रोहिदास कड, दिलीप फडतरे, अर्जुन पाटोळे, संदिप खेसे, प्रकाश कड, संदिप चौंडकर, मनिषा मेमाणे, पुष्पा चौंडकर आदींनी



सोसायटीचे उपाध्यक्ष यांना शुभेच्छा दिल्या.निवडणुकीचे कामकाज सचिव मंगेश शेंडगे यांनी पाहिले.निवडीनंतर काशिनाथ खळदकर यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी गावातील आजी, माजी पदाधिकारी, जेष्ठ, तरुण, महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

# दौंड नगरपालिकेत कोट्यवधींचा निधी कागदावर, मूळ आरक्षित जागा गायब; 'नमो गार्डन'च्या नियोजनात मोठा फेरफार?

■ जनप्रवास प्रतिनिधी

**दौंड :** दौंड शहराच्या सुनियोजित विकासासाठी आणि नागरिकांच्या करमणुकीसाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होत असताना, दौंड नगरपालिकेचा मात्र अत्यंत ढिसाळ आणि संशयास्पद कारभार समोर आला आहे. शहरात तब्बल ११ जागा उद्यानांसाठी अधिकृतपणे आरक्षित असताना, यातील एकही जागा आजतागायत नगरपालिकेच्या ताब्यात आलेली नाही. असे असताना, मूळ विकास आराखड्यात नसलेल्या बिगर–आरक्षित जागेवर 'नमो गार्डन' उभारण्याचा घाट घातला जात असल्याने, या संपूर्ण नियोजनामागे नेमके कोणाचे हित दडले आहे? असा संतप्त सवाल विचारत या गंभीर विषयावर नगरसेविका स्वाती निलेश सावंत यांनी थेट प्रशासनाला धारेवर धरले असून, दौंडच्या विकास आराखड्यातील विसंगती चव्हाट्यावर आणल्या आहेत.

नगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्याच कार्यालयीन टिपणीतून एक धक्कादायक बाब उघड झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत' दौंड शहरात उत्कृष्ट उद्यान विकसित करण्यासाठी १ कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर झाला आहे. मात्र, विकास आराखड्यात जाहीर केलेल्या ११ आरक्षित जागांपैकी एकही जागा प्रशासनाने अद्याप ताब्यात घेतलेली नाही. जागा ताब्यात नसताना निधी कशाच्या जोरावर आणि कुठे खर्च केला जाणार, हा मोठा प्रश्न आहे.



मुख्यमंत्र्यांसारख्या प्रतिष्ठेच्या 'नमो उद्यान' स्पर्धेत भाग घेण्याच्या घाईत, मुख्यधिकाऱ्यांनी वृत्तपत्रातून जाहीर केले की, एचडीएफसी बँकेसमोरील जागेत 'नमो गार्डन' विकसित केले जाईल. मात्र, अधिकृत विकास आराखडा तपासला असता या जागेवर उद्यानाचे कोणतेही आरक्षण उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आरक्षित जागा बाजूला ठेवून, बिगर–आरक्षित जागेवर कोट्यवधींचा निधी ओतण्याचा प्रशासनाचा हा निर्णय कोणत्या कायद्याच्या चौकटीत बसतो?

दौंड शहरातील उद्यानांच्या वाटणीत प्रचंड प्रादेशिक असंतुलन आणि पक्षपातीपणा दिसून येत आहे. सध्याची आणि प्रस्तावित बहुतांश उद्याने (उदा. अण्णाभाऊ साठे उद्यान, क्रीडा संकुल, छत्रपती उद्यान) ही केवळ दौंड–पाटस रस्ता आणि त्याच्या आसपासच्या परिसरात केंद्रित केली जात आहेत. याउलट, ज्या जुन्या गावठाण भागात शहरातील सर्वाधिक लोकसंख्या राहते, तिथे नागरिकांसाठी आणि लहान मुलांसाठी साधे हक्काचे मैदान किंवा उद्यान उपलब्ध नाही. हा जुन्या गावठाणातील जनतेवर थेट अन्याय असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

शासनाचा १ कोटी रुपयांचा निधी हा जनतेच्या हक्काच्या पैशातून आलेला आहे. तो केवळ ठराविक परिसराच्या विकासासाठी किंवा प्रशासकीय हट्टीपणामुळे चुकीच्या जागेवर वाया घालवू दिला जाणार नाही. जुन्या गावठाणातील दाट लोकवस्तीला उद्यानाच्या सुविधेपासून वंचित ठेवल्यास आणि आरक्षित जागांच्या संपादनात चालढकल केल्यास, प्रशासनाविरोधात जनआंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेविका स्वाती सावंत यांनी दिला आहे.

## पुरुषोत्तम मासानिमित्त पुणतांब्यात अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** पुरुषोत्तम मासानिमित्त राहता तालुक्यातील श्रीक्षेत्र पुणतांबा येथील सद्गुरु योगीराज गंगागिरी महाराज आश्रमात अखंड हरिनाम सप्ताह व गुरुचरित्र पारायण सोहळ्यास रविवारी मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

अधिकमासाच्या प्रारंभी या सोहळ्यास सुरुवात झाली सकाळी काकडा हरिपाठ होऊन गुरुचरित्र पारायण सोहळ्यास उत्साहात सुरुवात झाली या सोहळ्यास मोठ्या संख्येने पारायण आर्थी सहभागी झाले आहे, दि, १७ ते २० मे या कालावधीत हा सोहळा होणार



आहे. यानिमित्त ह भ प विश्वनाथ गिरीजी महाराज, अर्जुन गिरीजी महाराज , हरिचरण गिरीजी महाराज यांचे तर सप्ताहाच्या सांगतेस गोदावरी धाम सरला बेट चे महंत रामगिरीजी महाराज यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसाद वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे या कीर्तन सोहळा व कार्यक्रमास भाविक व ग्रामस्थांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आश्रमाचे महंत विजयानंद गिरीजी महाराज व भजनी मंडळाने केले आहे. दरम्यान, अधिकमासाच्या निमित्ताने येथील योगीराज चांगदेव महाराज व अन्य मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तर या निमित्य महिनाभर येणाऱ्या भाविकांना गोदावरी नदी कोरडी पडल्याने पवित्र स्नानाची पर्वणी साधता येणार नाही.

## पै. व्यंकटेश बनकर यांच्याकडून मारूती मंदिरास चांदीची गदा दान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान येथील कुस्ती पटू पै. व्यंकटेश बनकर यांनी चांदीची गदा टाकळीभान येथील ग्रामदैवत श्री मारूती मंदिरास दान केली आहे.



पै. व्यंकटेश बनकर यांनी नुकतीच ग्रिको केसरी कुस्ती स्पर्धा जिंकली असून धनगरवाडी येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत मानाची गदा जिंकली ती गदा बनकर यांनी मारूती चरणी अर्पण केली आहे. यावेळी दिलीप बनकर, काका कोकणे, गणेश कोकणे, विलास सपकाळ, श्रीराम जोशी, संदिप पटारे, साईनाथ खंडागळे, गोरख खुरूद, कलंके, अदिनाथ काटे, गणेश शेळके. सुधीर मगर, उत्कर्ष पुंड, अविनाश काटे, अजित म्हस्के, शुभम खंडागळे, अजित पवार, भाऊसाहेब शेळके, डॉ किशोर हळहुळे, बंटी कलंके, सुयोग गायकवाड, प्रमोद कलंके आदी उपस्थित होते.

## पायल पवारची मुंबई पोलीस दलात निवड, माळवाडगावात नागरी सत्कार संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**माळवाडगाव :** माळवाडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पायल पवार हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने मेहनत आणि जिद्दीच्या बळावर मिळवलेल्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




माळवाडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने पायल हिचा सत्कार करण्यात आला यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, उपाध्यक्ष तथा भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक पत्रकार संदीप आसने, सदस्य मनीषा आसने, सुरभी दांगट, विजय पवार, अमोल दांगट, मुख्याध्यापक देविदास मुंतोडे, मल्हारी ठोकळ, भालदंड मॅडम, अंगणवाडी सेविका मनीषा आसने, माधुरी लटमाळे, कोमल आसने, राजेंद्र पवार, आकाश पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पायल पवार हिच्या यशाचे कौतुक करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातील मुलींनी शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात, हे पायलने सिद्ध केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पायल पवार हिच्या निवडीमुळे माळवाडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून गावासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

## माळवाडगाव येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**माळवाडगाव :** माळवाडगाव येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात जगदंबा युवा प्रतिष्ठानच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाला जगदंबा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतीश आसने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माळवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सचिव प्रदीप आसने यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थितांनी घोषणाबाजी करत महाराजांना अभिवादन केले.

या प्रसंगी जगदंबा युवा प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक पत्रकार संदीप आसने, उपाध्यक्ष आतिश आसने, संघटक विठ्ठल आसने, देवराज आसने, तेजस आसने, शोएब पठाण, कार्तिक आसने यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून युवकांमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांप्रती प्रेरणा निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## संजय पवार यांना पुणे येथे 'महाराष्ट्र युवा आयकॉन पुरस्कार' प्रदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** महाराष्ट्र श्रम कामगार संघटना आयोजित 'भारत श्री' कार्य गौरव सोहळा २०२६ मध्ये, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल संजय दत्तु पवार यांना मानाचा 'महाराष्ट्र युवा आयकॉन पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा भव्य गौरव सोहळा रविवार, दिनांक १७ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता, पुणे येथील नवी पेठ स्थित पत्रकार भवन (गांजवे चौक) येथे अत्यंत उत्साहात पार पडला. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



होते. अथक परिश्रम, कर्तव्यनिष्ठा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान या सोहळ्यात करण्यात आला. संजय दत्तु पवार यांना हा पुरस्कार मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक नितेश घारे (स्टार प्रवाह वाहिनीवरील 'साधी माणसं' मालिकेतील 'रवी' फेम), लोकप्रिय अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष, अभिनेते व निर्माते मेघराज राजेभोसले यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून कोल्हापूर (हळकर्णी) येथील सुप्रसिद्ध समाजसेवक आणि 'जलदूत' डॉ. श्री. गंगाधर बाळाप्पा व्हसकोटी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष व आयोजक महाराष्ट्र श्रम कामगार संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बी. एन. खरात आणि संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. नवनाथ मोडक हे होते.

## शिक्षक आय. वाय. पठाण यांचे निधन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** जामखेड शहरातील पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे ल. ना. होशिंग माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीप्रिय. शिक्षक आय. वाय. पठाण यांचे दि १६ मे रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ८३ व्या वर्षी दु:खद निधन झाले. सर्व जाती धर्माच्या लोकांशी सलोख्याचे संबंध व सर्वांशी आपुलकीने वागण्याच्या स्वभावामुळे "पठाण सर" या नावाने



सर्वपरिचित होते . ३० वर्षे सेवा देतांना सलोख्याचे संबंध जोपासले. सायं ७ वा शहरातील कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात आला.

# जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावरच यश तुमच्या पायाशी लोळण घेईल : आमदार आशुतोष काळे

### राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या वतीने १० वी १२ वीच्या गुणवंतांचा गुण गौरव सोहळा संपन्न

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** शिक्षण हे केवळ गुण मिळवण्याचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची आणि उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारी प्रभावी शक्ती आहे. जीवनात मोठे ध्येय गाठायचे असेल तर सातत्यपूर्ण प्रयत्न, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास अत्यंत महत्वाचा असून जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावरच यश तुमच्या पायाशी लोळण घेईल असा बहुमोल सल्ला आमदार आशुतोष काळे यांनी ईयत्ता १० वी १२ वीच्या गुणवंतांना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, कोपरगाव यांच्या वतीने कलश मंगल कार्यालय येथे कोपरगाव मतदार संघातील ईयत्ता दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य 'गुणगौरव सोहळा' रविवार (दि.१७) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या शुभहस्ते सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडल्यास त्यांना भविष्यात अजून यशाची मोठी शिखरे सर करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी दरवर्षी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षाच्या वतीने आवर्जून ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. आजचा हा गौरव केवळ विद्यार्थ्यांचा नाही तर त्यांना अनमोल मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचा आणि त्यांच्या यशामागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या पालकांचा देखील आहे.आजची तरुण पिढी हेच उद्याचे भविष्य असून विद्यार्थ्यांनी केवळ पद आणि संपत्ती मिळवण्यासाठी नाही तर देशाच्या उभारणीसाठी आपल्या ज्ञानातून काय योगदान देवू शकतो याचा विचार केला पाहिजे. पुढील शिक्षण घेताना नवीन सवंगडी निवडतांना योग्य व्यक्तीची निवड करा. तुम्हीं मिळविलेल्या यशातून आपल्या गावाचा, तालुक्याचा आणि जिल्ह्याचा अभिमान वाढला पाहिजे याची जाणीव ठेवा. मोठे व्हा, पण आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवा असे सांगितले.

यावेळी सुप्रसिद्ध हास्य कवी यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि, हे स्पर्धेचे युग आहे शिक्षण आणि पदव्या मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे अनेक आवाहन आहेत. त्यमुळे मिळविलेल्या पदवीबरोबरच स्वत:च्या अंगी असलेली कला जोपासा त्या कलेचा तुमचे भविष्य उज्वल करण्यासाठी निश्चितपणे मदत होईल. मराठी भाषा हि जगात सगळ्यात चांगली भाषा आहे. हि भाषा जपण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांवर आहे. बाहेरच्या देशात राहणारी मराठी माणस मराठी अस्मिता जपत आहे. याचा खूप अभिमान वाटतो.

आयुष्यात पहिल्यांदा गोदामाईच्या कुशीत वसलेल्या कोपरगाव नगरीत आलो. विविधतेने नटलेले हे गाव अतिशय समृद्ध आहे. कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांना देखील भेटल्याच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला.आमदार आशुतोष काळे अतिशय शांत आणि सोज्वळ आणि राजबिंड व्यक्तिमत्व आहे. ते आवर्जून गुणवंतांचा सत्कार करतात हि अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे. कार्यक्रमाची गर्दी बघून मराठीपणाचा अभिमान वाटत असून हीच खरी महाराष्ट्राची संस्कृती असल्याचे त्यांनी सांगितले.

यापसंगी कर्मवीर शंकरराव




काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, ज्ञानदेव मांजरे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रविण शिंदे, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, गौतम बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव रक्ताटे, कारखान्याचे संचालक दिलीपराव बोरनारे, सचिन चांदगुडे, शंकरराव चव्हाण, श्रीराम राजेभोसले, दिनार कुदळे, प्रशांत घुले, सुनिल मांजरे, वसंतराव आभाळे, विष्णू शिंदे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, जिनिंग व प्रेसिंगचे संचालक शिवाजीराव शेळके, महेश लोंढे, गौतम बँकेचे संचालक शिरीष लोहकणे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, डॉ. चंद्रशेखर आव्हाड, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष शशिकांत देवकर, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, जनार्दन कदम, सोमेश आढाव, संदिप कपिले, विजय त्रिभुवन, राहुल शिरसाठ, वाल्मिक लहिरे, सोमनाथ आढाव, सुनिल शिलेदार आदींसह कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गुणवंत विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते.

## संक्षीप्त वृत्त

### हृदयासाठी ५ सुपरफूड्स : तुमची हृदयवाहिनी प्रणाली मजबूत ठेवा : ऋतिका समद्दार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** आजच्या वेगवान जीवनशैलीत शारीरिक हालचालींचा अभाव आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवर वाढती अवलंबित्व यामुळे उच्च कोलेस्टेरॉल, उच्च रक्तदाब आणि इतर हृदयविकारांच्या समस्या अधिक सामान्य होत आहेत. हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य पोषण महत्त्वाचे असून, बदाम, फॅटी फिश, हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये आणि फळांसारखे पोषक तत्वांनी समृद्ध अन्न आहारात समाविष्ट केल्यास मोठा फायदा होऊ शकतो. ऋतिका समद्दार, मॅक्स हेल्थकेअरमधील प्रादेशिक प्रमुख – डायटेटिक्स, यांनी हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त अशा काही सर्वोत्तम खाद्यपदार्थांविषयी माहिती दिली आहे, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यास आणि दीर्घकालीन आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात. कॅलिफोर्निया बदाम दररोजच्या आहारात एक मूठभर बदामांचा समावेश करणे ही चांगली सुरुवात ठरू शकते, कारण ते पोषक तत्वांनी समृद्ध असून एक आरोग्यदायी सुपरफूड मानले जाते. बदामांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रथिने, रिबोफ्लेविन, झिंक यांसह १५ आवश्यक पोषक घटक आढळतात. निरोगी आहाराचा भाग म्हणून कॅलिफोर्निया बदामांचा समावेश केल्यास एकूण आणि एलडीएल कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते तसेच हृदयाला हानी पोहोचवणारी सूज कमी होऊ शकते. जर्नल ऑफ द अमेरिकन हार्ट असोसिएशन मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, दररोज ४२ ग्रॅम बदामांचे सेवन केल्याने हृदयविकाराशी संबंधित अनेक जोखीम घटकांमध्ये सुधारणा झाली आणि एचडीएल कोलेस्टेरॉलमध्येही लक्षणीय वाढ झाली.

### पंडीत शशांक कट्टी कला सारथी या पुरस्काराने सन्मानित

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सुर संजीवन म्युझिक थेरपीचे संस्थापक, प्रसिद्ध सतारवादक व संगीतकार डॉ पंडीत शशांक कट्टी यांना कला सारथी हा पुरस्कार आर्ट ऑफ लिविंगचे गुरुदेव श्री श्री रवी शंकर, यांच्या हस्ते द आर्ट ऑफ लिविंग इंटरनॅशनल सेंटर, बेंगलुरू येथे नुकताच देण्यात आला.


भारतीय कला सादरीकरण, ललित कलांचे जतन, संगोपन, संवर्धन, टिकवून ठेवणे आणि प्रोत्साहन देण्यासाठी प्रेरक शक्ती ठरल्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. शशांक कट्टी यांच्या सतारीच्या सुरांतून भारतीय शास्त्रीय संगीताची आध्यात्मिक आणि उपचारात्मक परंपरा आणि ध्यानात्मक पैलू प्रभावीपणे दिसून येतात.पारंपरिक रागसंगीताच्या माध्यमातून ध्वनीलहरी मानवाच्या मन आणि आत्म्यावर सकारात्मक परिणाम करू शकतात हे त्यांनी प्रभावीपणे सिद्ध केले आहे.

या साठी त्यांना कला सारथी पुरस्कार त्यांना देण्यात आला. या वेळी शशांक कट्टी म्हणाले या पुरस्कारने मी आनंदित झालो आहे.गेल्या ३० वर्षातील प्राचीन आयुर्वेद , भारतीय पारंपारीक शास्त्रीय संगीत , मूड एलेव्हेशन थेअरी आणि आधुनिक साऊंड थेरपी यांच्या तत्वावर आधारित संशोधन करून सुर संजीवन संगीतोपचार डरे पाचशेहून अधिक शिष्य तयार केले. तसेच संगीतोपचार करून हजारो रुग्णांना दिलासा देण्याचे काम मी केले आहे. भारतीय संस्कृतीचा आध्यात्मिक आणि वैश्विक संदेश अधिक व्यापकपणे जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

### राहुरीत कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या गेटसमोरील नगर मनमाड महामार्गावर कंटेनर व दुचाकीच्या झालेल्या भीषण अपघातात श्रीगोंदा येथील एक ४८ वर्षीय इसम जागीच ठार झाल्याची घटना समोर आली.


मयत-मधुकर डोके

या घटनेतील मयत मधुकर गुलाब डोके, वय ४८ वर्षे, रा. आढळगाव, ता. श्रीगोंदा हे दि. १६ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास त्यांच्या मोटरसायकलवर नगरकडून राहुरीकडे येत होते. दरम्यान मधुकर डोके हे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या गेट समोर असताना समोरुन भरधाव वेगात आलेल्या कंटेनर क्रमांक एम एच ०४ एच वाय ३४२७ या कंटेनरने डोके यांच्या मोटरसायकल ला जोरदार धडक दिली.

यावेळी मधुकर डोके हे कंटेनरच्या चाकाखाली सापडले आणि जागीच ठार झाले. त्यांना तातडीने राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना उपचारा पूर्वीच मयत घोषित केले. मधुकर डोके हे श्रीगोंदा येथून राहुरी तालुक्यातील गुहा येथे त्यांच्या भाच्याकडे येत असताना हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने आढळगाव येथील काळाणेवस्ती परिसरात शोककळा पसरली आहे. या घटने बाबत राहुरी पोलीस ठाण्यात रात्री उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

### माळवाडगाव येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**माळवाडगाव :** माळवाडगाव येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात जगदंबा युवा प्रतिष्ठानच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाला जगदंबा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतीश आसने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माळवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सचिव प्रदीप आसने यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थितांनी घोषणाबाजी करत महाराजांना अभिवादन केले. या प्रसंगी जगदंबा युवा प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक पत्रकार संदीप आसने, उपाध्यक्ष आतिश आसने, संघटक विठ्ठल आसने, देवराज आसने, तेजस आसने, शोएब पठाण, कार्तिक आसने यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून युवकांमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांप्रती प्रेरणा निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आ. रोहित पवार यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर सीनाचे उन्हाळी आवर्तन सुटले



■ जनप्रवास प्रतिनिधी

**कर्जत :** उन्हाच्या तीव्रतेमुळे कर्जत मतदारसंघातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न होत असून आमदार रोहित पवार यांनी आज या विषयावर कालच (शुक्रवार, दि. १५) शेतकऱ्यांसह पुण्यात सिंचन भवन येथे कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन कुकडी आणि सीनाचे आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज (शनिवार दि. १६ मे) सीना धरणाचे उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले.

सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे कर्जत मतदारसंघात पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांनी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच कुकडीचे दुसरे आवर्तन सोडण्याची तसेच सीनातून उचलण्यात येणाऱ्या पाण्यावर नियंत्रण ठेवण्याची आणि उन्हाळी दुसरे आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. परंतु त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे आ रोहित पवार यांनी पुण्यात सिंचन भवन येथे जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंता आणि इतर अधिकारी यांच्यासह शेतकऱ्यांची बैठक घेऊन कुकडी आणि सीनातून तातडीने दुसरे उन्हाळी आवर्तन सोडण्याची आग्रही मागणी केली. त्यांच्या या मागणीला यश आले अूसन बैठकीच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे शनिवारी सीनाचे दुसरे आवर्तन सोडण्यात आले आहे.



याचा कर्जत तालुक्यातील तब्बल २१ गावांना शेतीसाठी, जनावरांसाठी आणि पिण्यासाठी फायदा होणार आहे. लाभक्षेत्रातील अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत हे आवर्तन पोहोचावे यासाठी ते किमान २१ दिवस सुरू ठेवण्याची मागणीही त्यांनी केली आहे. सीनाचे आवर्तन सोडण्यात आल्यामुळे पाण्याअभावी होरपळणाऱ्या पिकांना दिलासा मिळणार आहेच पण पिण्याच्या पाण्याच्या निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नातूनही दिलासा मिळणार आहे. याबाबत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून आ रोहित पवार यांचे आभार मानण्यात येत आहेत.

दरम्यान, कुकडीचे दुसरे उन्हाळी आवर्तन सोडण्याची मागणीही आ रोहित पवार यांनी केली होती. त्यानुसार २५ तारखेपर्यंत कुकडीचे आवर्तन सोडण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले, परंतु पाण्याची गरज लक्षात घेता त्यापूर्वीच आवर्तन सोडण्याची मागणी आणि आग्रह पवार यांनी धरला आहे. त्यामुळे कुकडीचे आवर्तन कधी सोडण्यात येते त्याकडेही कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## पिसोरे बुद्रक येथे मध्यरात्री जुगार अड्ड्यावर छापा : ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील पिसोरे बुद्रक येथे सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत आठ जणांना जुगार खेळताना ताब्यात घेण्यात आले असून दोन जण मोटारसायकलवरून पसार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. रोख रक्कम, वाहने, मोबाईल फोन व लॅपटॉप असा तब्बल ३२ लाख ५७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १६ मे २०२६ रोजी रात्री उशिरा पोलिसांना पिसोरे बुद्रक (ता. श्रीगोंदा) येथे अवैध जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार श्रीगोंदा पोलीस पथकाने बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीत मध्यरात्री विशेष छापा मोहीम राबवली. रात्री सुमारे १०.३० वाजल्यापासून पहाटे २.३० वाजेपर्यंत सुरू असलेल्या या कारवाईदरम्यान जुगार अड्ड्यावर सुरू असलेला प्रकार उघडकीस आला.

छाप्यात पोलिसांनी घटनास्थळावरून ७६ हजार ८०० रुपये रोख रक्कम जप्त केली. तसेच दोन चारचाकी व सहा दुचाकी वाहने मिळून सुमारे २६ लाख रुपयांची वाहने जप्त करण्यात आली. याशिवाय ५ लाख ११ हजार रुपये किमतीचे १० मोबाईल फोन तसेच ७० हजार रुपयांचा एक लॅपटॉपही पोलिसांनी ताब्यात घेतला.



कारवाईदरम्यान पकडण्यात आलेल्या आरोपींसह संपूर्ण मुद्देमाल बेलवंडी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आला असून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बेलवंडी पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. छापा पथकात श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे, पोहेकॉ संभाजी वाबळे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव कोहक, शरद गावडे, रविंद्र जाधव व सचिन वारे यांनी सहभाग घेतला.

## शेअर मार्केट गुंतवणुकीच्या आमिषाने ४८ लाखांची फसवणूक; आरोपी जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास १२ ते १५ टक्के परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सुमारे ४८ लाख ९९ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपीस कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. ऋषिकेश दत्तात्रय तोरडमल (वय २९, रा. माधवबाग, भिंगार) असे आरोपीचे नाव आहे.

आरोपीने छत्रपती संभाजी राजे चौक परिसरात गोल्डन गेट फिन्सर्व व आर एस ग्रुप ऑफ बिझनेस या नावाने कार्यालय सुरू करून अनेकांकडून गुंतवणुकीच्या नावाखाली पैसे जमा केले होते. अधिक परताव्याचे आश्वासन देऊन त्याने गुंतवणूकदारांची फसवणूक केली आणि नंतर फरार झाला होता.

दरम्यान, आरोपी भिंगार परिसरात येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर कोतवाली पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणी तानसेन सुरेश बिवाल यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बेलवंडी पोलिसांची धडक कारवाई; चार ठिकाणी छापे; २६ लाखांचा गुटखा व वाहने जप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात अवैध गुटखा व सुगंधी पान मसाल्याच्या विक्रीविरोधात बेलवंडी पोलिसांनी मोठी कारवाई करत चार ठिकाणी छापे टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत गुटखा, पान मसाला तसेच वाहने मिळून तब्बल २६ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीतील लोणी व्यंकनाथ व आढळगाव परिसरात अवैध गुटखा विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिल्यानंतर बेलवंडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने छापेमारी केली.

लोणी व्यंकनाथ येथे प्रवीण सतीश गायकवाड यांच्या किराणा दुकान, गोडाऊन व क्रेटा वाहनाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात गुटखा व सुगंधी पान मसाला साठवून ठेवलेला आढळून आला. तसेच शरद सिताराम वडवकर हे त्यांच्या किराणा दुकानात अवैधरित्या गुटखा विक्री करत असल्याचेही निदर्शनास आले.

दरम्यान, किराणा दुकानदारांना गुटखा पुरवठ्यासाठी आलेले मारुती सुझुकी कॅरी वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले. या वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये गुटखा व पान मसाल्याचा साठा मिळून आला. वाहन चालक नागेश नीलकंठ सुमकवर याला पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली असता, हा माल रवी बबन दळवी यांच्या सांगण्यावरून पुरवठ्यासाठी आणल्याची माहिती समोर आली.



याच चौकशीत आढळगाव शिवारातील अक्षय राजू होले यांच्याकडेही गुटखा पुरवठा केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून आणखी गुटखा जप्त केला.

या संपूर्ण कारवाईत गुटखा व पान मसाला मिळून ४ लाख ४० हजार २९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच २२ लाख रुपये किमतीची क्रेटा, टोयोटा ग्लांजा आणि मारुती सुझुकी कॅरी अशी वाहनेही पोलिसांनी हस्तगत केली आहेत.

कारवाईदरम्यान शरद सिताराम वडवकर (रा. लोणी व्यंकनाथ) व नागेश नीलकंठ सुमकवर (रा. श्रीगोंदा) यांना ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बेलवंडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस हवालदार भाऊसाहेब यमगर, धर्मराज दहिफळे, पोलीस नाईक शरद गांगर्डे तसेच पोलीस कर्मचारी कैलास शीपनकर, राजू भोर व दादासाहेब शिरसागर यांच्या पथकाने ही कारवाई करण्यात आली.

## भांडगाव खून व चोरी प्रकरण उघड; आरोपी २४ तासांत अटकेत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील भांडगाव येथे खून करून जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत अटक केली. आरोपीकडून १० लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



सिद्धेश खरमाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अज्ञात व्यक्तीने त्यांच्या वडिलांचा डोक्यात वार करून खून केला व घरातील रोकड व सोन्याचे दागिने चोरून नेले होते. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान महेश हनुमंत खरमाळे (रा. भांडगाव) याने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपल्या पुतण्याचा हातोड्याने वार करून खून केल्याची व घरातील रोकड चोरल्याची कबुली दिली. आरोपीकडून १० लाख २९ हजारांची रोकड, मोबाईल, मोटारसायकल व अन्य साहित्य जप्त करण्यात आले असून पुढील तपास पारनेर पोलीस करीत आहेत.

## अधिक मासानिमित्त आयोजित महिला व उद्योजकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन

### उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी : दिपाली बारस्कर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अधिक मासानिमित्त प्रतिबिंब संस्थेच्या पुढाकारातून महिला व उद्योजकांसाठी चांगल्या प्रकारे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनातून महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळते.व नवीन व्यवसाय करण्यासाठी व्यासपीठ खुले झाले आहे.शहराच्या मध्यवर्ती भागात हे प्रदर्शन असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळणार आहे.

तसेच प्रत्येकाला आपल्या व्यवसायाची ब्रॅण्डिंग करण्यासाठी व मार्केटिंग व प्रचार करण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे.या उद्योजकता प्रदर्शनातून ग्राहकांचा थेट संपर्क व जोडणी होऊन वर्षभर ग्राहक जोडले जाणार असल्याचे प्रतिपादन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांनी केले आहे.



अधिकमासा निम्मित १६ व १७ मे रोजी प्रतिबिब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय , दिल्लीगेट येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील२५ महिलांचे स्टोल आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी उपसभापती वर्षा सानप, रेणुका महिला मंडळाच्या अध्यक्षा गायत्री कुलकर्णी, संयोजिका अनुजा कांबळे, वनिता मानकर, जयश्री सूळ, ऋतुजा धोत्रे , प्रिया भागवत आदी उपस्थित होते.

## संत शेख महंमद महाराज मठाच्या वक्फ नोंदणी रद्द

### प्रक्रियेला गती; दोन महिन्यांत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा येथील संत शेख महंमद महाराज मठाच्या वक्फ बोर्डाकडील नोंदणीप्रकरणी धर्मादाय उपायुक्त कार्यालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्टची वक्फ बोर्डाकडे झालेली नोंदणी रद्द करण्याबाबत दोन महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांनी संबंधित विश्वस्तांना दिल्याची माहिती ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

संत शेख महंमद महाराज मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या प्रश्नावरून गेल्या वर्षी श्रीगोंदा शहरात महिनाभर विविध आंदोलने झाली होती. तसेच मठाची वक्फ बोर्डाकडील नोंदणी रद्द करण्यासाठी अनेक सामाजिक व धार्मिक संघटनांनी आंदोलन छेडले होते.

याप्रकरणी ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर यांच्याकडे चौकशी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या अर्जानुसार, शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्टची नोंदणी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांतर्गत ‘ई-७१’ प्रकारात असताना २००८ मध्ये वक्फ बोर्डाकडे नोंदणी करण्यात आली होती. या नोंदणीबाबत आक्षेप घेत संबंधित नोंद रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती.

या प्रकरणात विविध स्तरांवर सुनावण्या व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर धर्मादाय उपायुक्तांनी संबंधित न्यासाच्या विश्वस्तांना वक्फ बोर्डाकडील नोंदणी रद्द करण्यासाठी आवश्यक ठराव मंजूर करून दोन महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

घनश्याम शेलार यांनी सांगितले की, संत शेख महंमद महाराज हे संत तुकाराम महाराजांचे समकालीन वारकरी संत होते. मुस्लिम समाजात जन्म असूनही त्यांनी भागवत धर्माची शिकवण स्वीकारून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यामुळे संत शेख महंमद महाराजांचे स्थान हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून मानले जाते. श्रीगोंदा शहरातील दोन्ही समाजांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या या देवस्थानास ग्रामदैवताचा मान मिळालेला आहे.

मागील काही वर्षांपासून संत शेख महंमद महाराज मठ, मंदिर व दर्गाह व्यवस्थापनावरून गावकरी यात्रा कमिटी आणि शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट यांच्यात वाद सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर वक्फ बोर्डाकडील नोंदणी रद्द करण्याबाबतचा अर्ज मंजूर झाल्याने आंदोलनकर्त्यांनी निर्णयाचे स्वागत केले आहे.



यावेळी पोपट (आबा) खेतमाळीस, नगरसेवक दादा औटी, अनिल औटी, यात्रा कमिटीचे अध्यक्ष गोपाळराव मोटे, उपाध्यक्ष अशोक आळेकर, नवनाथ दरेकर, सतीश मखरे, बाळासाहेब दुतारे, सुधीर खेडकर, किसन आघाव आदी उपस्थित होते.

# ज्या लोकांच्या तळव्यावर असतात हे खास चिन्ह, ते असतात भाग्यवान

पायांच्या तळव्यावर आढळून येणाऱ्या चिन्हांचा मनुष्याच्या जीवनावर प्रभाव पडत असतो. तळव्यावरील प्रत्येक चीन्हाचे एक निश्चित स्थान आणि महत्त्व असते. पायाच्या तळव्यांवरून कोणत्याही व्यक्तीचे भविष्य, आचार-विचार जाणून घेण्याचा पहिला प्रयत्न भारतमध्ये झाला होता. या विद्येचे सर्व श्रेय आपल्या ऋषीमुनींना जाते.

ज्याप्रकारे एखाद्या व्यक्तीच्या हातावरील रेषा पाहून त्याच्या स्वभाव, चरित्र, भूत-भविष्याबद्दल जाणून घेणे शक्य आहे, ठीक त्याचप्रमाणे पायांच्या तळव्याची बनावट व त्यावरील चिन्ह पाहून व्यक्तीच्या स्वभावाच्या गुप्त गोष्ट सहजपणे माहिती करून घेणे शक्य आहे. या विद्येला सामुद्रिक शास्त्र किंवा शरीर लक्षण विज्ञान म्हटले जाते.

- ज्या व्यक्तीच्या तळव्यांवर शुभ लक्षण म्हणजे कमळाचे फुल, शंख, तलवार, साप, पद्म, बाण, ध्वज इ. चिन्ह असतात. असा व्यक्ती एखाद्या राजासमान जीवन व्यतीत करतो.

ज्या व्यक्तीचे तळवे पिवळे, बोटं मोराच्या पंजाप्रमाणे पसरलेले, पायावर निळ्या नसा (शिरा) स्पष्ट दिसत असतील आणि तळवे नेहमी थंड राहत असतील, तर अशा व्यक्तीला आयुष्यभर दुःख भोगावे लागते आणि आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशाप्रकारचे तळवे असणारे काही लोक वाईट वृत्तीचे असतात, ज्यामुळे त्यांना सामाजिक आणि कौटुंबिक जीवनातही सुख मिळत नाही. या लोकांचा नेहमी इतरांच्या पैशांवर डोळा असतो.

तळव्यांचा रंग पांढरा असलेला व्यक्ती दारू आणि इतर नशांचा आदी असतो. हे लोक चांगेल-वाईट, पाप-पुण्याचा विचार



करत नाहीत, यांच्या मनाला जे योग्य वाटते तेच काम करणारे असतात. अशा लोकांचे जीवन समाज आणि कुटुंबासाठी त्रासदायक राहते.

ज्या लोकांच्या तळव्यांचा रंग काळा असतो ते आपत्यहीन असतात. यांची वंश परंपरा पुढे चालत नाही. असा व्यक्ती विविध आजारांनी ग्रासलेला असतो. हे लोक आयुष्यभर आर्थिक अडचणीमध्ये राहतात.

- ज्या व्यक्तीच्या पायांचे तळवे रेशाहीन, फाटलेले असतात, त्याला जीवनात विविध प्रकारचे कष्ट सोसावे लागतात. नेहमी आर्थिक विवंचनेत राहतात.


- ज्या लोकांचे तळवे जाड, कडक असतात असे लोक सामान्यतः रोगी असतात. हे विविध आजारांनी ग्रासलेले असतात आणि यांचा मृत्यू एखाद्या रोगामुळेच होतो.

ज्या व्यक्तीच्या पायांच्या तळव्यांचा रंग फिकट लाल आणि गुलाबी असतो, तो व्यक्ती भाग्यशाली आणि नेहमी उन्नती करणारा असतो. हे लोक नेहमी इतरांच्या भल्याचा विचार करतात. हे लोक आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये नेहमी अशा विचारात असतात. अशा प्रकारचे तळवे असणारे लोक साहित्य कलेच्या क्षेत्रामध्ये नाव कमावतात. यांचे कौटुंबिक जीवन सुखी राहते.

शरीर लक्षण विज्ञानानुसार मांसल, गुलाबी, कोमल, आकर्षक तळवे शुभ आणि उच्च फलदायक असतात. एका उच्चस्तरीय पायाची बोटं व्यवस्थित, टाच गोलाकार आणि तळवे नेहमी गरम असावेत. हे सर्व लक्षण एखाद्या व्यक्तीमध्ये असतील तर तो व्यक्ती निश्चितच भाग्यवान असतो. अशा व्यक्तीचे सामाजिक आणि कौटुंबिक जीवन यशस्वी राहते.

# 'योगा आणि जीम' मधील फरक काय ?

पूर्वी लोक लोक व्यायामासाठी व्यायामशाळा, आखाड्यांत जात होते. पण हल्ली जीममध्ये जाऊ लागले आहेत. जीममध्ये शरीर नक्कीच कमावता येते, पण दैनंदिन जीवनासाठी त्याचा तितका उपयोग आहे काय? याचा विचार आपण करायला हवा.



तुम्हाला एखाद्या शरीरसौष्ठव स्पर्धेत सहभागी व्हायचे असेल, कुस्तीत जायचे असेल, हिरो बनायचे असेल किंवा वजन उचलायचे असेल तर जीम किंवा आखाड्यात जाणे योग्य आहे. पण हे सर्व करायचे नसेल तर मग थोडा विचार करणे जरूरी आहे. जीममद्ये अंगमेहनतीची कसरत करून घेतली जाते. या उलट घरगुती योग प्रकारत संपूर्ण अंगाला व्यायाम दिला जातो. पण उगाचच 'घामकाढू' मेहनत होत नाही. जीमच्या कसरतीनंतर तुम्हाला थकवाजाणवतो पण योगासन केल्यानंतर तुम्हाला ताजेतवानं वाटायला लागतं.

वयाचा फरक

लहानपणी शरीर फारच लवचिक असतं. लहान मुलगा छोट्या मोठ्या जागेवरून पडतो तेव्हा त्याला फ्रॅक्चर होण्याची शक्यता कमी असते पण तरूण व्यक्तीपडतो तेव्हा त्याला फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते. जीममध्ये हाडे व स्नायू दणकट होतात. पण जीम मध्येच सोडली तर हे कमावलेले शरीर सुटते. टणकझालेली हाडे आणि स्नायू म्हातारपणाकडे लवकर घेऊन जातात.

जीमचे शरीर

जीम जाण्यामुळे शरीर मजबूत व दणकट होते. त्या शरीराला अतिरिक्त जेवणाची गरज पडते. पण जीम सोडल्यानंतर शरीर एकदम ढिले पडू लागते म्हणून जीमची कसरत सुरू ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा हात-पायाचे दुखणे सुरू होते. वय वाढल्या बरोबरच सांध्यांची दुखणी डोके वर काढतात. स्नायू दुखू लागतात.

योगाचे शरीर

योग केल्याने शरीर लवचिक आणि मऊ होते. शरीराला अतिरिक्त भोजनाची गरज भासत नाही. योग केल्याने रोगप्रतिरोधक क्षमतेत वाढ होते. जास्त काळ योग केल्यानंतर शरीरात कुठल्याही प्रकारचे दुष्परिणाम होत नाही. जीमला जावे असे वाटत असेल तर जरूर जा! पण शरीराला थकवण्यासाठी नको!

# आपल्या बाळाचा आहार कसा असावा

स्वयंपाकात बनविलेले, बिनतिखटाचे पदार्थ आपल्या हाताने कुस्करून बाळाला भरवावेत. त्यासाठी मिक्सरचा वापर करू नये. थोडे जास्त

शिजविलेले डाळ-भात, कुस्करलेले बटाटे-टोमॅटो, रताळी, तसेच फळेसुद्धा बारीक करून द्यावीत.



बाळाच्या आहारासाठी काही रेसिपीज

खिचडी : तांदूळ चार मोठे चमचे, भाजलेली मुगाची डाळ १.५ चमचे पाणी टाकून चांगले शिजवावे. पाणी पूर्ण संपण्याआधी दोन मोठे चमचे पालेभाजी, थोडे मीठ टाकावे. शेवटी थोडे जिरे टाकावे.

नाचणीचे पीठ चार मोठे चमचे, हरभऱ्याचे पीठ चार छोटे चमचे, आणि भाजलेली डाळ चार मोठे चमचे, दोन चमचे साखर किंवा गूळ असे सारे

पदार्थ एकत्रित मिसळून शिजवावे.

बाजरीचा चुरमा : भाजलेली बाजरी चार चमचे, भाजलेली मुगाची डाळ एक मोठा चमचा, भाजलेले शेंगदाणे दोन छोटे चमचे, भाजलेले तीळ दोन छोटे

चमचे असे घ्यावेत. हे सारे व्यवस्थितपणो मिसळून हा चुरमा डब्यात भरून ठेवावा. दर वेळी दोन चमचे मिश्रण दुधात किंवा पाण्यात मिसळून द्यावे.

गेहुना : भाजलेले गहू तीन मोठे चमचे, भाजलेले मूग दोन मोठे चमचे, भाजलेले शेंगदाणे दोन छोटे चमचे, गूळ दोन मोठे चमचे, या सर्व वस्तू वेगळय़ा दळून त्यात गूळ मिसळून गरज असेल तसे वापरावे.

# स्नान करताना फक्त एक उपाय करा आणि आयुष्यभर चिरतरूण राहा

पन्नाशीतील बॉलीवूडमधील सुंदर दिसणाऱ्या अभिनेत्री बघितल्या की या वयात आपणही सुंदर आणि चिरतरूण दिसू का, असा विचार प्रत्येकाच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. आपण सुंदर आणि तरूण दिसाव अस प्रत्येकाला वाटत असते.

जर आपण काही जुन्या परंपराचे पालन केले तर आजही तजेलदार त्वचा आणि आकर्षक चेहरा दिसू शकतो. आज आम्ही तुम्हाला एक परंपरा सांगणार आहोत, या परंपरेचे पालन केल तर तुम्हीही सुंदर आणि चिरतरूण दिसू शकता. मात्र स्नान करण्या आगोदर हा उपाय करावा लागेल.

स्नान केल्यानंतर शरीर स्वच्छ होते, हे प्रत्येकाला माहित असते. शास्त्रामध्ये प्रत्येक धार्मिक कार्य करताना स्नान करण्याचे सांगितले जाते. स्नान न करता पुजा-पाठ करणे अशुभ माणले जाते. आपल्या दिनचर्ये पैकी स्नान करणे ही एक महत्त्वाची बाब माणण्यात येते. स्नान करण्याचे शस्त्रात काही नियम सांगण्यात आले आहेत. या नियमाचे पालन केले तर तुम्हीही चिरतरूण वाटायला लागतात.

तेल मालीश-

स्नान करण्याआगोदर पुर्ण शरी-रावर तेल मालिश करा. यामुळे त्वचेची समक वाढते. तेल मालिश केल्यामुळे त्त्वचेवरील मळ, घान, धुळेचे कन निघुन जातात. तेल मालिश केल्यानंतर त्वचा पुर्ण साफ आणि पवित्र होते. यामुळे शरीरासाठी लागणारे वातावरणातील पोषक तत्वे ग्रहण करण्यास मदत होते. यामुळे चांगले आरोग्य लाभते.



तेल मालिश करण्यासाठी मोहरीचे तेलाचा उपयोग केला तर लाभदायक ठरते. जर तुम्हाला मोहरीच्या तेलाने मालिश करणे आवडत नसेल तर इतर तेलाने मालिश करू शकतात. जोपर्यंत त्वचा तजेलदार दिसते, तो पर्यंत तुम्ही तरूण दिसता.

स्नान करण्याची योग्य पद्धत-

स्नान करताना सर्वात अगोदर डोक्यावर पाणी टाका. या नंतर सर्व शरीरा-वर पाणी टाका. यामागे वैज्ञानिक कारण आहे. या प्रकारे स्नान केल्यानंतर शरिरातील गर्मी पाण्याबरोबर वाहून जाते. यामुळे मानसिक शांती मिळते.

स्नान मंत्र-

गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति।।

नर्मदे सिन्धु कावेरि जलऽस्मिन्सन्निधिं कुरु।।

स्नान करताना या मंत्राचे स्मरण केल्यानंतर पुण्य प्राप्ती होते.

स्नान करण्याचे प्रकार-

- ब्रह्ममुहर्तावर करण्यात येणारे स्नानाला ब्रह्म स्नान म्हटले जाते.

- सुर्यदेवाचे स्मरण करून केले गेलेल्या स्नानाला देव स्नान म्हटले जाते.

- पहाटे केलेल्या स्नानाला ऋषी स्नान म्हणून ओळखले जाते.

- सुर्योदयानंतर करण्यात आलेल्या स्नानाला मानव स्नान म्हणतात.

- सकाळी चहा नाष्टा झाल्यांनतर केलेल्या स्नानाला दानव स्नान म्हणून ओळखतात.

शास्त्रानुसार ब्रह्म स्नान, देव स्नान, ऋषी स्नानाला सर्वश्रेष्ठ स्नान माणल्या जाते. सुर्यग्रहनाच्या वेळी स्नान केले तर अशुभ मानल्या जाते.

# माणसाने का नसावं धनहीन, जाणून घ्या काही शास्त्रीय नियम

माणसाला विकास करण्यासाठी पैसा असावा लागतो. ज्या लोकांकडे पैसा नसतो, ते लोक परिपूर्ण असू शकत नाहीत, असे शास्त्रात सांगितले आहे. व्यावहारीक जीवनाच्या दृष्टीकोणातून सुख दुःखाचा अर्थ म्हणजे धन असे सांगण्यात आले आहे. माणसाच्या जीवनात पैसा हा सर्वात मोठी भूमिका पार पाडतो.

यामुळेच पैशाला अर्थात धनला शास्त्रामध्ये महत्त्व दिलेले आहे. शास्त्रानुसार माणसाच्या पुरूषार्थामध्ये पैसा, संपत्तीचे विशेष महत्त्व आहे. यामुळे आज आम्ही आपल्याला पैशाचे जीवनात काय महत्त्व आहे, याविषयी माहिती देणार आहोत.

वैयक्तिक कामे करण्यासाठी आणि आपल्या लक्ष्यापर्यंत पोचण्यासाठी पैसा महत्त्वाची भुमीका पार पाडतो.



पैसा जवळ असेल तर सकारात्मक विचार करण्याची शक्ती आपोआप मिळते.

श्रीमंत असो किंवा गरीब, नाते टिकवण्यासाठी महत्त्वाची भुमीका पैश्यामुळे पार पाडता येते. नात्यातील आनंद जगण्यासाठी बळ देतो. मात्र हा आनंद टिकवण्यासाठी पैसा हा महत्त्वाची भुमीका पार पाडतो.

तुमच्या जवळ पैसा नसेल, तुम्ही कंगाल असाल तर तुमचा वेळही कटत नाही. मानसिक त्रास होतो, निराशा येते. मात्र पैसा आल्यानंतर किंवा धनप्राप्ती झाल्यानंतर आत्मविश्वास वाढतो.

- यामुळे धन प्राप्तीची इच्छा मानसात उर्जा निर्माण करते.

- धन परिवार, समाजामध्ये प्रतिष्ठा निर्माण करून देते.

- धर्म शास्त्रामये चार पुरूषार्थ सांगण्यात आले आहेत. काम आणि मोक्ष मिळवण्यासाठी अर्थ म्हणजे धन मिळवल्या शिवाय शक्य नाही, असे शास्त्रामध्ये सांगण्यात आले आहे.

# जाणून घ्या, स्त्रिया का फोडत नाहीत नारळ



हिंदु धर्मात पूजेसाठी श्रीफळाला विशेष महत्त्व आहे. कोणत्याही देव-देवताची पूजा करण्यासाठी नारळ हे महत्त्वाचे मानले जाते. नारळाशिवाय देवदेवताची पूजा अपुर्ण राहते, असे माणल्या जाते. नारळ आहारात घेतल्यानंतर अशक्तपणा कमी होतो. देवाला नारळ अर्पण केल्याने परिवारतील सर्व दुःख दुर होतात.

नारळाचा वरचा भाग कडक असला तरी आतील भाग नरम आणि गोड असतो. प्राचिन काळात नारळा संदर्भात विविध परंपरा सांगण्यात आल्या आहेत. या परंपरेपैकी महिलांनी नारळ फोडू नये अशी एक परंपरा आहे. महिलांनी नारळ फोडणे अशुभ असल्याचे शास्त्रामध्ये सांगितले आहे. आज आम्ही आपल्याला या परंपरेविषयीची माहिती देणार आहोत.

स्त्रिया फोडत नाहीत नारळ-

काही मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये स्त्रियांना येणाची मुभा नसते. याबरेबरच सगळीकडे महिलांनी नारळ न फोडण्याची परंपरा आहे. नारळ हे बीजरूपी असल्यामुळे स्त्रियांनी नारळ फोडू नये अशी परंपरा आहे. नारळ फोडणे म्हणजे बळी देणे. भारतीय संस्कृतीमध्ये पुरूषांना बळी देण्याचा अधिकार असल्यामुळे नारळ स्त्रिया फोडत नाहीत.

नारळाच्या पाण्याने अभिषक-

नाराळ फोडल्यानंतर नारळाच्या पाण्याने देव-देवतांना अभिषक घातला जातो. देवतांना खुश करण्यासाठी प्राण्यांचा बळी दिला जात असे. या परंपरेवर बंदी घातल्यानंतर नारळाच्या माध्यमातून अभिषेक घालायला सुरूवात झाली.

सौभाग्याचे प्रतिक-

नारळाला श्रीफळाचे प्रतिक मानले जाते. असे सांगण्यात आले आहे की, भगवान विष्णु यांनी पृथ्वीवर अवतार घेतल्यानंतर सोबत तीन गोष्टी आणल्या होत्या. यामध्ये लक्ष्मी, नारळ, कामधेनु घेऊन आले होते. नारळाच्या वृक्षाला कल्पवृक्ष म्हणून ओळखले जाते.

सन्मान करण्यासाठी वापरतात नारळ-

श्रीफळ हे शुभ, समृद्धि, सन्मान, प्रगती, सौभाग्याचे सुचक म्हणून ओळखले जाते. सन्मान करण्यासाठी शॉल व श्रीफळ दिले जाते.

एकाक्षी नारळ-

नारळाच्या जटाखाली डोळ्यासारखे दोन काळे ठिपके असतात. मात्र एकाक्षी नारळामध्ये फक्त एक ठिपका असतो. एकाक्षी नारळ चमत्कारी नारळ असल्याचे शास्त्रामध्ये सांगण्यात आले आहे. या नारळामुळे घरातील संकट दुर होतात.

मालामाल होण्याचा उपाय-


शुक्रवारी महालक्ष्मीच्या पुजेमध्ये श्रीफळ ठेवा. पुजा झाल्यानंतर हे श्रीफळ तिजोरीमध्ये ठेवा. तिजोरीमध्ये ठेवलेले श्रीफळ रात्री श्रीगणेशाच्या मंदिरामध्ये अर्पण करा.

लाभदायक औषध-

- लहान मुलांना दुध पचन होत नसेल तर, दुधा सोबत नारळाचे पाणी पिण्यासाठी दिल्यानंतर अशक्तपणा दुर होण्याबरोबर लहान मुल सुंदर दिसते. नारळाचे खोबरे खाल्ल्यानंतर कामशक्ती वाढते.

अशक्तपणा दुर होतो-

नारळाचे पाणी प्यायल्या नंतर गर्भवती स्त्रियांचा अशक्तपणा दूर होतो. खोबरे खाल्लानंतर दृष्टी वाढण्यास मदत होते.



# डोळ्यांच्या शृंगारासाठी काय कराल

स्त्रियांच्या डोळ्यांचे महत्त्व तर खूपच आहे. ज्या महिलांच्या डोळ्यांवर निसर्गाची जास्त कृपादृष्टी नसेल त्याही नेत्रप्रसाधनांच्या योग्य वापर करून आपल्या डोळ्यांना सुंदर बनवू शकतात.

डोळ्यांच्या शृंगारासाठी पूर्वी अंजन, काजळ, सुरमा या घरगुती प्रसाधनांचा वापर केला जात असे. हल्ली मात्र यासाठी अनेक प्रसाधने उपलब्ध आहेत. त्यांचा योग्य पद्धतीने कसा वापर करावा ते जाणून घेऊ या. आय ब्रो पेन्सिल -तशा आपल्या देशातील बहुतेक महिलांच्या भुवया दाट व काळ्याभोर असल्यामुळे त्यांना आय ब्रो पेन्सिलची गरज नसते. पण ज्यांच्या भुवया विरळ असतील त्या आयब्रो पेन्सिलच्या साह्याने त्या दाट करू शकतात.

आय लायनर - आयलायनर एक द्रव पदार्थ असतो. तो पापण्यांच्या केसांसाठी वापरतात. ब्रशने पातळ रेषेच्या रूपात लावल्यास डोळ्यांचा आकार सुंदर होतो. जर डोळे छोटे असतील तर रेषा रूंद असणे उपयुक्त असते. डोळ्यांच्या शृंगारात प्रथम आय शॅडो, नंतर आयलायनर व शेवटी मस्कार वापरला जातो.

आय शॅडो - आय शॅडो भुवया व पापण्यामधील नाजूक त्वचेवर लावला जातो. आयशॅडेची निवड पेहरावानुरूप करणे जास्त आकर्षक असते. एखाद्या उत्सव, विवाह वा इतर खास प्रसंगी जाताना अत्यंत कमी आयशॅडो लावावा. डोळ्यांवर आयशॅडो वापरल्यास डोळे जास्त गहिरे वाटतात. टपोऱ्या डोळ्यांवर भुऱ्या रंगाचा आयशॅडो वापरावा. शॅडो भुवयांपर्यंत भरल्याने उभार कमी होतो.

मस्कारा - मस्कारा पापण्या दाट बनवते. ब्रशने मस्कारा पापण्यांच्या मुळांपासून टोकांपर्यंत लावावा. दिवसा काळ्या रंगाचा मस्कारा तर रात्री काळ्या आय लायनरसह गडद रंगाच्या मस्काऱ्या - सोबत हलकासा आयशॅडो आकर्षक दिसतो.

दक्षता - रात्री झोपण्यापूर्वी डोळ्यांचा शृंगार स्वच्छ करावा. बेबी ऑईल वा मेकअप रिमूव्हरने तो स्वच्छ करता येतो. यासाठी प्रथम डोळे मिटून घ्यावेत. आणि कापसावर वा सूती कापडावर थोडेसे तेल टाकून डोळ्यांच्या बाहेरच्या टोकाकडून नाकाच्या दिशेने मेकअप स्वच्छ करावा. यानंतर कापसाने वा कापडाने पापण्यांखालील भाग स्वच्छ पुसावा. बऱ्याचदा नेत्र प्रसाधनांचा दुष्परिणामही होतो. मेकअपनंतर डोळे लाल होणे, डोळ्यांजवळील त्वचेची आग होणे व डोळ्यांतून पाणी येणे इ. तसेच डोळे कुरूप व सुजल्यासारखे दिसणे. यासाठी डोळ्यांसाठी नेहमी उत्तम प्रतीची प्रसाधने वापरावीत. मेकअपचे दुष्परिणाम दिसताच चटकन मेकअप स्वच्छ करावा.

# भारतातील लोकांना वेड लावणारं विकेंड मॅरेज म्हणजे नेमकं काय?


भारतात कधी कोणता ट्रेंड प्रसिद्ध होईल काहीच सांगता येत नाही पण सध्या भारतीय तरूण तरूणींमध्ये विकेंड मॅरेड या लग्नाचा ट्रेंड धुमाकूळ घालत आहे. पण नेमका हा प्रकार आहे तरी काय? जोडप्यांना हा प्रकार का आवडू लागला आहे? जाणून घेऊया पूर्ण माहिती.

एखादं नातं टिकवण्यासाठी वेळ, समजूतदारपणा आणि जवळीक ही तिन्ही तत्त्वं अत्यंत आवश्यक असतात, असं नेहमी सांगितलं जातं. पण सध्या समाजात एक नविन ट्रेंड दिसून येतोय ज्याला 'वीकेंड मॅरेज' असं म्हटलं जातंय. ऐकून थोडं आश्चर्य वाटेल, पण या प्रकारात पती-पत्नी एकत्र राहत नाहीत.

आठवड्यातून एक किंवा दोन दिवस भेटतात आणि उर्वरित वेळ वेगवेगळ्या ठिकाणी, आपापल्या जबाबदाऱ्या सांभाळत जगतात. पण यामागील नक्की हेतू काय असतो? याचा फायदा होतो की तोटा? नवरा बायको दोघांची याला संमती असते का? जाणून घेऊया या विचित्र ट्रेंडबद्दल सर्व माहिती.

**नेमकं काय आहे हे विकेंड मॅरेज प्रकार?** : अशा प्रकारच्या लग्नात एकमेकांच्या सहवासापेक्षा वैयक्तिक स्वातंत्र्याला अधिक महत्त्व दिलं जातं. अनेक जोडपी मोठ्या शहरांमध्ये नोकरीच्या निमित्ताने दूर राहत असतात. काही जण मुद्दामहून एकमेकांना थोडं अंतर देतात, जेणेकरून नात्यातील तोचतोचपणा कमी होईल. अशा जोडप्यांमध्ये प्रेम कमी नसतं, पण नातं टिकवण्याची पद्धत वेगळी असते. हा ट्रेंड भारतात विशेषतः शहरी भागांमध्ये दिसून येतो आहे. काहींच्या मते ही गरज बनली आहे, तर काहींना वाटतं की ही एक योग्य निर्णयप्रक्रिया आहे, जी नात्याला नवीन श्वास देऊ शकते. पण यामागे काही सकारात्मक तर काही नकारात्मक बाजू आहेत.

## नवरा बायकोच्या सहमतीने घेतला जातो एक विचित्र निर्णय



चला, जाणून घेऊया वीकेंड मॅरेजबाबतचे ५ महत्त्वाचे पैलू...

**व्यक्तिस्वातंत्र्याला अधिक वाव** : वीकेंड मॅरेजमध्ये दोघांनाही स्वतःच्या आयुष्याचा वेगळा रस्ता चालता येतो. नोकरी, करिअर, हॉबीज यासाठी पुरेसा वेळ मिळतो. एकमेकांवर सततची नियंत्रण किंवा जबाबदाऱ्या कमी असल्यामुळे वैयक्तिक विकास शक्य होतो. एकत्र राहण्यामुळे जे वाद उद्भवतात, त्यापासून काही अंशी सुटका मिळते.

**एकमेकांची ओढ जपली जाते** : रोजचं एकमेकासोबत राहणं अनेकदा सवय बनतं, पण वीकेंड मॅरेजमध्ये ही सवय ओढीत बदलते. आठवड्याभराने भेटल्याने एकमेकांना भेटण्याचा उत्साह, प्रेमभावना अधिक तीव्रतेने जाणवतात. हे नातं अधिक रोमँटिक आणि ताजंतवानं ठेवण्यास मदत करू शकतं.

**घरच्या जबाबदाऱ्यांत समन्वय करणे कठीण** : या नात्याची दुसरी बाजू म्हणजे घरातील जबाबदाऱ्या एकत्र न सांभाळल्याने अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. मुलांचं संगोपन, आर्थिक नियोजन, कौटुंबिक गरजा या सर्व गोष्टींसाठी योग्य समन्वय लागतो. तो जर कमी झाला, तर नातं तुटण्याची शक्यता वाढते.

**समाज आणि कुटुंबाचा दबाव** : भारतीय समाज अजूनही पारंपरिक कुटुंबव्यवस्थेला प्राधान्य देतो. त्यामुळे अशा प्रकारचं लग्न अनेकांना विचित्र वाटतं. नातेवाईक, शेजारी, आणि समाजातील लोक अशा नात्याकडे शंकेच्या नजरेने पाहतात. परिणामी मानसिक ताण निर्माण होऊ शकतो.

**नात्याला समजून घेणं गरजेचं** : वीकेंड मॅरेजमध्ये यश मिळवण्यासाठी प्रचंड समजूतदारपणा लागतो. एकमेकांवर विश्वास, संवाद आणि भावनिक जाणीव लक्षात घेणं आवश्यक असतं. हे नातं फक्त शारीरिक जवळिकेवर नाही, तर मानसिक स्थैर्यावर अवलंबून असतं. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना दोघांनीही सखोल विचार करावा लागतो.

■■■

# जरा घ्या समजून बायकोचा स्वभाव...!



विवाह मंडपात भटजी दोन जिवांना वैवाहिक सूत्रात बांधून 'आजन्म पतीसेवेत धन्यता मानेन' किंवा पतीला 'मी पत्नीला आनंदी ठेवेन तिचे सुख दु:ख माझे मानेन' असं कबूल करून नवरदेवाला पत्नीच्या गळ्यात मंगळसूत्र बांधायला देतो. तेव्हा नवरदेवाला गुदगुल्या होत असतात.

मग संसाराला सुरूवात होते. तेव्हा पाऊस पडून गेलेला असतो आणि संसारक्षीतिजाचे इंद्रधनुष्य एकेक रंग सोडत फिके होत असते. पत्नीचा स्वभाव कळून यायला वर्ष सव्वा वर्ष लागते. तोपर्यंत ती गरोदर राहिलेली असते. त्यावेळी तिला मानसिक व शारीरिक त्रास द्यायला नको म्हणून पतीदेव समजूतदार होतात व बऱ्याच वेळा मूग गिळून गप्प बसतात.

याचाच नेमका विचित्र अर्थ काढून नातेवाईक, स्नेही त्याला 'बायकोचा बैल', 'जोरू का गुलाम', 'ताटाखालचे मांजर' वगैरे म्हणून सुनावत राहतात.

स्त्रियांच्या दु:खाना लगेच वाचा फुटते. कारण बायका मोठ्याने रडतात. तसे पुरूष पटकन् आणि मोठ्याने रडू शकत नाही. संसार फुलला, उमलला, बहराला आलावगैरे स्तुतिसुमन पुरूष एकतो तेव्हा मनात म्हणतो या संसारबागेला फुलविण्यासाठी माझी माती वापरली आहे. थोडक्यात काय तर पुरूषांना लग्न करून झक मारली असे वाटत असतं; पण ते कबूल करत नाहीत. त्यात त्यांचा मोठेपणा असतो.

पूर्वापार चालत आलेल्या प्रथेनुसार एखादा पुरूष आपल्या पत्नीला काही सुनावू लागला तर लोक लगेच म्हणतात, 'पती आहे का कसाई ? सारखा का तिच्यावर खेकसतो ? पत्नी आहे. मोलकरीण नाही. स्वत: पाणी भरावं, भांडी घासावीत.'

म्हणजे पुरूष पटकन् स्वजाती विरोधात जातो आणि बायकांची बाजू घेतो. काही पुरूषच इतके उत्साही असतात की, पत्नीचं अंथरूण घालतात, तिला चहा करून देतात, डोकं दाबतात; पण पुरूष 'मी बायकोचे पाय दाबले' असं सांगायला शेजारीपाजारी जात नाही; पण स्त्री लगेच शेजारणीला म्हणेल, 'रात्री एक वाजता यांच्या कानाला ठणक लागला न् रात्रभर शेकत बसले यांना.'

पुरूषांना कठोर म्हणणाऱ्यांनी एकदम जीभ उचलून काहीतरी बोलू नये. एक बैलपोळा सण तेवढाच पुरूषी आहे बाकी सगळे सण स्त्रियांकरीताच आहेत. पुरूष आपल्या पत्नीसाठी खूप खूप काही करत असतो; पण बायकोने कधी नवऱ्याचे कौतुक केलेले ऐकलं आहे का ?

# ग्रीन टी पिण्याची सवय स्वत:ला कशी लावायची? रोज ग्रीन टी पिण्याचा शरीराला कसा फायदा होतो?

वाईट सवयी सोडणे आणि चांगल्या सवयी स्वतःला लावणे नेहमीच कठीण जाते. त्यामुळे अनेकदा आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून अशा गोष्टी कराव्या लागतात ज्या आपण कधीच केलेल्या असतात. त्यातील एक म्हणजे ग्रीन टी पिणे होय. पण, चहा किंवा कॉफी पिणाऱ्यांना ही सवय स्वतःला लावणे एका आव्हानापेक्षा कमी नाही आहे. तर आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, ही सवय स्वतःला कशी लावून घ्यावी.

तेव्हा आज आपण फक्त ग्रीन टीचे फायदेच नाही, तर ग्रीन टी पिण्याची सवय कशी लावून घ्यायची याबद्दलसुद्धा सांगणार आहोत.


**जास्त अँटिऑक्सिडंट्स :** ग्रीन व ब्लॅक टी दोन्ही एकाच वनस्पतीपासून येतात. पण, त्यांच्या पानांवर वेगवेगळ्या पद्धतीने प्रक्रिया केली जाते. ग्रीन टीमध्ये ब्लॅक टीप्रमाणे ऑक्सिडेशन होत नाही आणि त्यामुळे वनस्पतीमधील आरोग्यदायी अँटीऑक्सिडंट्सचे चांगल्या रीतीने जतन होते ; असे हार्वर्ड टी. एच. चॅन स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ येथील पोषण तज्ज्ञ व सहायक प्राध्यापक टेरेसा फंग स्पष्ट करतात.

**हृदयरोगाचा धोका कमी :** चहामध्ये पॉलीफेनॉल असतात, जे एक प्रकारचे अँटीऑक्सिडंट असते आणि ते ऑक्सिडेटिव्ह तणावापासून आपले संरक्षण करते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी करते.

**रक्तातील साखरेचे नियमन :** ग्रीन टी रक्तातील साखर कमी करण्यास मदत करू शकते. २०१९ मध्ये २७ अभ्यासांच्या विश्लेषणात असे आढळून आले की, अल्पकालीन आणि दीर्घकालीन ग्रीन टीचे सेवन उपवासाच्या रक्तातील साखरेची पातळी कमी करते.

**दात किडण्यास प्रतिबंध :** ग्रीन टी प्यायल्याने दात किडण्यास प्रतिबंध होतो. कारण- त्यात नैसर्गिकरीत्या फ्लोराईड असते.

**वजन कमी करण्यास मदत :** हार्वर्ड हेल्थच्या मते,



ग्रीन टीमध्ये आढळणारे कॅफिन आणि कॅटेचिन नावाचे अँटीऑक्सिडंट्स चयापचय क्षमता वाढवू शकतात. त्यामुळे वजन कमी करण्यास प्रोत्साहन मिळू शकते.

**ग्रीन टी पिण्याची सवय कशी लावायची**

**अलार्म सेट करा :** अरे यार, मी विसरलो, असे आपण अनेकदा म्हणून मोकळे होतो. तर यावर मार्ग म्हणून तुम्ही तंत्रज्ञानाची मदत घ्या. एक कप ग्रीन टी पिण्याची आठवण करून देण्यासाठी तुमच्या फोनवर अलार्म सेट करा. एकदा सवय झाली की, आठवण करून देण्यासाठी तुम्हाला अलार्मची गरज भासणार नाही.

**वेगवेगळे फ्लेवर्स ट्राय करा :** बऱ्याच लोकांना ग्रीन टीची चव आवडत नाही आणि म्हणूनच ते पिण्यास नकार देतात. पण, तुम्ही ग्रीन टीमध्ये पुदिना, लिंबू, मध टाका आणि मग पिऊन पाहा.

**ग्रीन टीचा सॅशे आजूबाजूला ठेवा :** जर ग्रीन टी जवळपास नसेल, तर त्याचे सेवन करण्याचे तुम्हाला विस्मरण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे ग्रीन टीचा सॅशे तुमच्या डेस्कवर किंवा तुमच्या बॅगेत ठेवा.

**तुमचे विचार बदला :** कधी कधी मानसिकतेतील एक साधा बदल सर्व फरक निर्माण करतो. 'ग्रीन टी पिणे' याकडे कंटाळवाणी कृती म्हणून पाहू नका. त्याऐवजी त्याकडे आरोग्याच्या दृष्टिकोनातून बघा आणि कामातून छोटासा ब्रेक घेऊन ग्रीन टी प्या. म्हणजे तुम्हाला दररोज ग्रीन टी पिण्याची सवय लागेल.

**संयम बाळगा :** सर्व चांगल्या गोष्टी स्वीकारण्यासाठी वेळ लागतो,. किमान या बाबतीत तरी. तुम्ही व्यग्र असल्याने विचलित झाल्यामुळे किंवा मन नसेल म्हणून एक किंवा दोन दिवस ग्रीन टी पिण्याचे विसरल्यास काही हरकत नाही. पण, ग्रीन टी पिण्याची सवय स्वतःला लावूनच घ्या.

# रात्री वाय-फाय बंद करून झोपल्यावर शरीराचे नुकसान होते की फायदा?

केस कधी धुवायचे, नखे कोणत्या दिवशी कापायची, अगदी नोकरीसाठी मुलाखत द्यायला जाताना काय करावे, याबद्दल सोशल मीडियावर रील्स आणि फोटोद्वारे अनेक माहिती शेअर होताना दिसतात. तसेच आपण माहिती वाचल्यावर लगेचच त्यावर विश्वास ठेवतो आणि इतरांना शेअर करून मोकळे होतो. या सगळ्या विषयांमध्ये रात्री झोपताना वाय-फाय राउटर बंद करून झोपावे याबद्दलही तुम्ही नक्कीच वाचले असणार. पण, यामागे काही विज्ञान आहे का? तर याचबद्दल जाणून घेण्यासाठी तज्ज्ञांशी चर्चा केली आणि वाय-फाय राउटर बंद केल्यावर शरीरात काय बदल होतो हे जाणून घेतले.

हैदराबादमधील लकडी का पूल येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलमधील कन्सल्टंट फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले की, एका आठवड्यासाठी रात्री वायफाय राउटर बंद केल्याने व्यक्तींमध्ये शारीरिक बदल होण्याची शक्यता फारच कमी आहे.

वायफाय उपकरणे लो लेव्हल (low-level), नॉन-आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात, जे वैज्ञानिक एकमतानुसार दररोजच्या संपर्कासाठी सुरक्षित आहेत. पण, ज्या लोकांना इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड्स (EMFs) बद्दल संवेदनशीलता असल्याचे आढळले आहे त्यांच्यासाठी, हा बदल डोकेदुखी, झोपेचा त्रास किंवा मानसिक थकवा यासारख्या लक्षणांपासून आराम देऊ शकतो. असे असले तरीही इलेक्ट्रोमॅग्नेटिक अतिसंवेदनशीलतेचे समर्थन करणारे क्लिनिकल पुरावे अनिर्णित आहेत, असे डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले आहेत.



हैदराबाद येथील अपोलो हॉस्पिटल्सचे सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉक्टर सुधीर कुमार म्हणाले की, याबद्दलचे बहुतेक अभ्यास प्राण्यांवर करण्यात आले आहेत आहेत. त्यामुळे वाय-फाय राउटर पाइनल ग्रंथीमधून मेलाटोनिन उत्पादनात व्यत्यय आणतात किंवा माणसांना झोपण्यात व्यत्यय आणतात याचा कोणताही पुरावा नाही. डॉक्टर सुधीर कुमार यांच्या मते, वाय-फाय राउटर 2.4 GHz किंवा 5 GHz फ्रिक्वेन्सी बँडमध्ये नॉन-आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात; जे खूप कमी-ऊर्जेचे ईएमएफ आहेत आणि जे मोबाईल फोन डोक्याजवळ धरल्यावर उत्सर्जित होणाऱ्या किरणांपेक्षा खूपच कमी आहेत.

घरामध्ये १ ते २ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर असताना, या EMFs ची तीव्रता झपाट्याने कमी होते. त्यामुळे, एक सामान्य वायफाय राउटर मेलाटोनिन या झोपेस मदत करणाऱ्या संप्रेरकाच्या निर्मितीवर परिणाम करतो किंवा पीनियल ग्रंथीचं (pineal gland) काम बिघडवतो, ही शक्यता खूपच कमी आहे. दुसरीकडे, ब्लू लाईट पाइनल ग्रंथीच्या कार्यात व्यत्यय आणून झोपेच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर प्रतिकूल परिणाम करतो ; असे डॉक्टर कुमार म्हणाले आहेत.

याव्यतिरिक्त, रात्रीच्या वेळी डिजिटल एंगेजमेंट कमी केल्याने मेलाटोनिनचे उत्पादन चांगले होऊ शकते, जे झोपण्याच्या आणि उठण्याच्या चक्राचे नियमन करण्यासाठी जबाबदार आहेत. तसेच रात्री वायफाय बंद करण्याचा झोपेच्या गुणवत्तेवर अप्रत्यक्षपणे फायदे होतो. म्हणजेच वायफायचा वापर दीर्घकाळ स्क्रीन एक्सपोजरशी संबंधित असतो. त्यामुळे वायफाय बंद केल्याने रात्रीचा स्क्रीन वापर मर्यादित होऊ शकतो, शांत झोप लागण्यास मदत होऊ शकते. तसेच संज्ञानात्मक कार्य, रोगप्रतिकारक प्रतिसाद आणि एकूण आरोग्यामध्ये दर्जेदार झोपची भूमिका बजावते ; असे डॉक्टर रेड्डी म्हणाले आहेत.

सलग सात दिवस वाय-फाय बंद केल्याने थेट जैविक परिणाम होत नसले तरी, चांगल्या झोपला समर्थन देऊ शकतात - जे शारीरिक आणि मानसिक दोन्ही आरोग्यासाठी महत्वपूर्ण योगदान देतात.

■■■

# छान छान गोष्टी... कोल्हा आणि काकडीवाला

भिकोबाचा भाजीपाल्याचा खूप मोठा मळा होता. भिकोबा ऋतुमानप्रमाणे मळ्याची निगा राखी. त्यामुळे ज्या त्या मोसमात त्याला चांगलां उत्पन्न होई. सर्वांत काकडीचा मळा त्याला फार आवडे.

भिकोबा काकडीच्या मळ्याची चांगली निगा राखी. मळ्यात काकडीला सुरुवात झाली की तो स्वत: राखण करी.

तरी सुद्धा रोज रात्री एक कोल्हा येऊन मळ्यातील चांगल्या चांगल्या कोवळ्या कोवळ्या काकड्या खाऊन जायचा. भिकोबाने कोल्ह्याला पकडायचा खूप प्रयत्न केला. पण कोल्होबा सहजासहजी हाती लागत नव्हते. रात्री राखण करताना जागा बदलून पाहिल्या; पण कोल्हा आधीच टेहेळणी करुन जात असल्याने कोल्होबा आधीच निसटून जात असे. तो काकड्या नेहमीप्राणेच खाई, पण भिकोबाच्या हाती सापडत नसे. भिकोबाने खूप युक्त्या करुन पाहिल्या; पण सगळ्या युक्त्या फसल्या.

शेवटी भिकोबाच्या बायकोला युक्ती सुचली. भिकोबाला ती पसंत पडली. सूर्य माथ्यावर येईपर्यंत दोघांनी झाडाचा चीक गोळा केला. घरी येऊन त्याच्या बायकोने त्याचा छानसा बाहुला बनवला. रात्र होताच दोघंजण बाहुला घेऊन मळ्यावर गेली. कोल्हा येण्याच्या वाटेवर त्याने तो बाहुला बसविला.

कोल्हा आला, बाहुला पाहून फसला नि म्हणाला,

काय रे पोरा, तो भिकोबा थकला, म्हणून आज तुला नवीन राखणदार नेमलंय वाटतं !

बिचारा चिकाचा बाहुला तो ! तो काय उत्तर देणार ? बाहुला काहीच हालचाल करीत नाही, असे पाहून कोल्हा हळूहळू त्याच्या जवळ गेला आणि त्या बाहुल्याच्या गालावर पंजा खाडकन मारला. पंजा चिकटून बसला.

काय कार्ट व्दाड आहे बघा ! अरे, सोड सोड मला ! आता मात्र कोल्हा चांगलाच रागावला.

'थांब, आता तुझ्या नरडीचा घोट घेतो. काकडीची चव गेली, तरी हरकत नाही. नरडीचा घोट घेण्यासाठी त्यानं आपल्या तोंडानं त्या चिकाच्या बाहुल्याचा गळा धरला. आता त्याचं तोंड चिकटलं.

भिकोबा व त्याच्या बायकोने काकड्या खाऊन माजलेल्या त्या कोल्ह्यास यथेच्छ चोप दिला.

# मैत्री बळकट करण्यासाठी संपर्क वाढवा

चांगल्या संबंधांचा सूत्रधार असतो संपर्क. एकमेकांशी संपर्क राहिला नाही तर रक्ताच्या नात्यातदेखील दुरावा येतो. मैत्रीचे संबंध असायला हवेत. मैत्रीच्या संबंधामुळे संपर्कामुळे भावनात्मक, मानसिक व व्यावहारिक जवळीक निर्माण होते. चांगल्या संपर्कावरच प्रभावशाली संबंध अवलंबून असतात. आपापसातले संबंध बळकट करण्यासाठी व्यक्तीला एकमेकांना धरून राहिले पाहिजे. दृष्टिकोन, अनुभव आणि उद्दिष्ट याच गोष्टी एकमेकांशी जोडल्या जातात. संबंध हे रक्ताच्या नात्याने, विवाह-ाच्या नात्यातून किंवा मैत्री अथवा विचारांमधील समानता यातून जुळले जातात. अशा संबंधांचा सूत्रधार असतो संपर्क. जर आपला एकमेकांशी संपर्क राहिला नाही तर रक्ताचे नाते देखील तुटले जाते. आपला एकमेकांशी संपर्क राहिल्यास भावनात्मक, मानसिक व व्यावहारिक जवळीक बनून राहते.

जीवनात अनेकांबरोबर संपर्क येतो. मूल शाळेला जाऊ लागते तेव्हा त्याला नवनवे मित्र मिळतात. त्यामुळे त्याच्यात मित्रत्वाची भावना बळकट होते. त्याला प्रेमाची भाषा कळू लागते.

जसजसे त्याचे वय वाढू लागले तसतसा तो अनेकांच्या संपर्कात येऊ लागतो. शाळेतून कॉलेज, कॉलेजातून आपल्या कार्यक्षेत्रात असा त्याचा प्रवास होतो. या दरम्यान लोकांच्या वेगवेगळ्या आवडीनिवडी, त्यांचे स्वभाव, त्यांची वेगवेगळी क्षेत्रे इत्यादींची त्याला माहिती होते. आपल्या संपर्काद्वारे तो आपले संबंध मजबूत करतो; परंतु हे संबंध कायम टिकवून ठेवण्यासाठी त्याला काही विशेष गोष्टींकडे लक्ष देणे खूप आवश्यक आहे. त्याला आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवणे जमले पाहिजे. तुम्ही इतरांबाबत किती जागरूक आहात यावर तुमचे सगळे यश अवलंबून असते. चांगला संपर्क असतानाही हे संबंध दृढ कसे राहतील, हे पाहण्याची आवश्यकता आहे.

तुम्ही नेहमी आपले कुटुंब, मित्र, सहकारी यांच्या संदर्भातील अधिकाधिक माहिती करून घ्या. त्यांच्या गोष्टी लक्षपूर्वक ऐका. दुसऱ्यांवर विश्वास ठेवा. त्यांना प्रोत्साहित करण्यासाठीच्या भावनेला आपल्या जीवनात स्थान द्या. त्यागाच्या भावनेला महत्व द्या. आभार मानण्याची भावना बाळगा. आपले संबंध मजबूत करण्यासाठी इतरांच्या संस्कृतीविषयी माहिती घ्या. नेहमी इतरांच्या संस्कृतीतून काही शिकण्याचा प्रयत्न करा. मित्राचे यश आपले यश समजा. जर तुमचा सहकारी तुम्हाला तुमच्या कामाता मदत करत असेल, तर आभार मानण्यास विसरू नका. सहनशीलतेच्या भावनेचा विकास करा. सहनशीलता ही यशाची सीमा निश्चित करते. तुम्ही दुसऱ्यांच्या काही गोष्टींवर सहमत होऊ शकत नसला तरी तुम्ही त्यांच्या कार्यशैलीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहायला हवे. कारण प्रत्येकाची कार्यशैली वेगवेगळी असते. जीवनात यशस्वी होण्यासाठी इतरांचा आदर करा. आदर दिल्यानंतरच मान मिळतो.

तुम्ही इतरांचा जितका आदर कराल, तेवढा अधिक मान-सन्मान तुम्हाला मिळेल. तुम्ही इतरांच्या जीवनात कसे व किती योगदान देता यावर तुमच्या संबंधाचा टिकाऊपणा अवलंबून आहे. तुमच्या उपस्थितीमुळे इतरांच्यात बदल घडावा, असा प्रयत्न नेहमी तुमच्याद्वारे होणे आवश्यक आहे. मनुष्य आपले जीवन एकट्याने व्यतित करत नाही. त्याला आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण दुसऱ्याला वाटावासा वाटतो. परंतु असे क्षण तुम्ही कसे जगता, हे तुमच्यावर अवलंबून आहे. चांगल्या संबंधावरच तुमची प्रसन्नता टिकून राहते आणि त्यावर अवलंबून असते ते तुमचे यश !

# उन्हाळ्यात घाम येऊन तेलकट व चिकटपणामुळे चेह-यावरचे छिद्र झाले बंद?

उन्हाळ्यात इतका घाम येतो की तेलकट आणि चिकटपणामुळे चेहऱ्यावरील छिद्र बंद होतात. त्यात घाण जमा होते. या समस्यांमुळे पिंपल्सही येतात. यापासून मुक्ती मिळवण्यासाठी खाली दिलेले घरगुती फेसपॅक नक्की लावून बघा.

उन्हाळ्याचे दिवस सुरू होताच त्वचेच्या समस्या सुरू होतात. वाढती उष्णता, घाम, धूळ आणि प्रदूषण यांचा थेट परिणाम आपल्या चेहऱ्यावर होतो. त्वचा तेलकट वाटू लागते, चेहऱ्यावर चिकटपणा निर्माण होतो आणि ओपन पोअर्समध्ये घाण साचून मुरुमं, डाग आणि डलनेस वाढतो. बाजारात मिळणारी स्किनकेअर प्रॉडक्ट्स ही तात्पुरता परिणाम देतात, शिवाय काही वेळा त्यांचे दुष्परिणामही होऊ शकतात.

अशावेळी घरच्या घरी तयार करता येणारे फेस पॅक हे उत्तम पर्याय ठरतात. हे फेस पॅक नैसर्गिक घटकांनी बनवले जात असल्याने त्वचेला कोणतीही हानी न पोहोचवता ती स्वच्छ, टवटवीत आणि उजळ बनवतात. विशेषतः तेलकट त्वचेसाठी हे फेस पॅक एकदम फायदेशीर ठरतात. चला तर पाहूया अशाच पाच नैसर्गिक फेस पॅकसंबंधी माहिती, जे तुम्हाला उन्हाळ्यातही फ्रेश आणि ग्लोइंग त्वचा देऊ शकतात.

**बेसन आणि गुलाबपाण्याचा डीटॅन फेस पॅक** : बेसन हे पारंपरिक त्वचा शुद्धीकरणासाठी वापरले जाणारे घटक आहे. दोन चमचे बेसनात गुलाबपाणी घालून पेस्ट तयार करा आणि त्यात अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावून १५ मिनिटे ठेवा आणि मग थंड पाण्याने धुवा. बेसन त्वचेवरील अतिरिक्त तेल शोषून घेतं, तर लिंबाचा रस त्वचा उजळवतो आणि डीटॅनिंग करतो. गुलाबपाणी त्वचेला थंडावा देतं. हा फेस पॅक आठवड्यातून दोन वेळा लावल्यास चेहरा तेलकट न होता स्वच्छ आणि तजेलदार राहतो.

**मुलतानी माती आणि चंदनाचा थंडावा देणारा पॅक**

उन्हाळ्यात चेहऱ्याला थंडावा देणं अत्यंत महत्त्वाचं असतं. एक चमचा मुलतानी माती आणि अर्धा चमचा चंदन पावडर यामध्ये गुलाबपाणी मिसळा आणि गारसर पेस्ट तयार करा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा आणि १५-२० मिनिटांनी धुवा. मुलतानी माती त्वचेमधील अतिरिक्त तेल शोषते, ओपन पोअर्स घट्ट करते आणि त्वचेला थंडावते. चंदन त्वचेवरील लालसरपणा कमी करतं. हा फेस पॅक मुरुमांपासून सुटका मिळवून त्वचेचं नैसर्गिक संतुलन राखतो.

**टोमॅटो-लिंबाचा नैसर्गिक ब्राइटनिंग पॅक** : टोमॅटोमध्ये लायकोपीन नावाचा अँटीऑक्सिडंट असतो, जो त्वचेला डीटॅन करतो आणि डलनेस कमी करतो.


Truhome FINANCE

मागणी सूचना

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक: SBTHPUNH0002077 & SILHPUNH0002078**<br>**१. श्री. मदन विठ्ठल शिंदे (एम. व्ही. शिंदे) (कर्जदार)**<br>**२. सौ. राधा मदन शिंदे (सह-कर्जदार)**<br>**सर्व रहिवासी: फ्लॅट नं. बी-१०२, साई पुष्कराज, लेन नं. ४, सर्व्हे नं. ३/५/१, १५/१/१७, लक्ष्मी नगर, अनिता फ्लोअर मिल जवळ, कोंढवा बुद्रुक, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११०४८.**<br>**तसेच येथे:- फ्लॅट नं. बी-१०२, साई पुष्कराज, लेन क्र. ४, सर्व्हे नं. ३/५/१, १५/१/१७, लक्ष्मी नगर, अनिता फ्लोअर मिल जवळ, कोंढवा बुद्रुक, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११०४८.**<br>**कर्जाची रक्कम – रु. १६,८९,४९६/- & रु.९,३२,५१८/-**<br>**एनपीए तारीख – ०६/०५/२०२६** | मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, म्हणजे "साई पुष्कराज को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि." मधील "साई पुष्कराज" नावाच्या इमारतीच्या विंग नं. बी मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १०२, ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ ६२० चौ. फूट म्हणजेच ५७.६२ चौ. मीटर आहे, ही इमारत खालीलप्रमाणे असलेल्या जमिनीवर बांधलेली आहे :-अ) सर्व्हे नं. ०३, हिस्सा नं. ५/१/१५, क्षेत्रफळ ०० हे. ०४ आर म्हणजेच ४०० चौ. मीटर ब) सर्व्हे नं. ०३, हिस्सा नं. ५/१/१७, क्षेत्रफळ ०० हे. ०३ आर म्हणजेच ३०० चौ. मीटर क) सर्व्हे नं. ०३, हिस्सा नं. ५/१/१३, क्षेत्रफळ ०० हे. ०३ आर म्हणजेच ३०० चौ. मीटर ड) सर्व्हे नं. ०३, हिस्सा नं. ६/१/३सी, क्षेत्रफळ ०० हे. ०१ आर म्हणजेच १०० चौ. मीटर अशा एकूण ०० हे. ११ आर म्हणजेच ११०० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीवर बांधलेली असून, मौजे कोंढवा बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे येथे स्थित आहे व पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत तसेच उप-नोंदणी कार्यालय हवेली, जि. पुणे यांच्या अधिकार क्षेत्रात येणारी मिळकत. | मागणी सूचना तारीख:<br>१२-०५-२०२६<br>मागणी सूचना रक्कम:<br>दिनांक ११-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SBTHPUNH0002077 अंतर्गत रु. १७,४५,५५४.००/- (फक्त सतरा लाख पंचेचाळीस हजार पाचशे चौपन्न रुपये) आणि कर्ज खाते क्र. SILHPUNH0002078 अंतर्गत रु. ९,७५,४०३.००/- (फक्त नऊ लाख पंच्याहत्तर हजार चारशे तीन रुपये) तसेच आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व आनुषंगिक खर्च, खर्च इ. |
| **कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता** | **प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता** | **मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु.** |
| **कर्ज खाते क्रमांक.- SHLHPUNH0001587**<br>**१. श्री. विनोद तानाजी शिंदे (कर्जदार)**<br>**२. सौ. पायल विनोद शिंदे (सह-कर्जदार)**<br>**सर्व राहणार पत्ता :-**<br>**फ्लॅट नं. १४, लक्ष्मी अंगण, सर्व्हे नं. १६३/ए, हडपसर, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११०२८.**<br>**तसेच दुसरा पत्ता :- फ्लॅट नं. ३०२, तिसरा मजला, सनबीम को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नवीन सर्व्हे नं. २२/१ए, फुरसुंगी, पुणे - ४१२३०८.**<br>**कर्जाची रक्कम – रु. २५,११,१२५/-**<br>**एनपीए तारीख – ०६/०५/२०२६** | मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग,म्हणजे "सनबीम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी" नावाच्या प्रकल्पातील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०२, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ ३३.९५ चौ. मीटर असून, टेरेस क्षेत्रफळ ५.५६ चौ. मीटर, ड्राय बाल्कनी क्षेत्रफळ ३.२५ चौ. मीटर तसेच कव्हर्ड बाल्कनी क्षेत्रफळ ४.७१ चौ. मीटर आहे, ही मिळकत सर्व्हे नं. २२१/१ए/१ (जुना सर्व्हे नं. १७७) असलेल्या जमिनीवर बांधलेली असून, मौजे फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे येथे स्थित आहे व पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत येणारी मिळकत. | मागणी सूचना तारीख:<br>१२-०५-२०२६<br>मागणी सूचना रक्कम:<br>दिनांक ११-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SHLHPUNH0001587 अंतर्गत रु. २७,६४,०८२.००/- (फक्त सत्तावीस लाख चौसष्ट हजार ब्याऐंशी रुपये) तसेच आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व आनुषंगिक खर्च, खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - पुणे
दिनांक - १६/०५/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

# कलाविश्व

## माधुरीचा फ्लॉप चित्रपट, सुपरस्टार देखील झाला फेल



बॉलिवूडमध्ये एक काळ असा होता की अभिनेत्री माधुरी दीक्षितचे नावच चित्रपट हिट होण्यासाठी पुरेसे मानले जात होते. ९० च्या दशकात तिचे स्टारडम शिखरावर होते. तेजाब', Hum Aapke Hain Koun..!, Saajan यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमधून तिने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. मोठमोठे निर्माते-दिग्दर्शक तिच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवत होते. मात्र एका चित्रपटाच्या अपयशाने प्रसिद्ध दिग्दर्शक राकेश रोशन यांना मोठा धक्का बसला होता.

१९९७ साली प्रदर्शित झालेला कोयला' हा चित्रपट राकेश रोशन यांनी दिग्दर्शित आणि निर्मित केला होता. या चित्रपटात शाहरुख खान आणि माधुरी दीक्षितची जोडी पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर झळकली होती. चित्रपटावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला होता आणि तो बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई करेल, अशी अपेक्षा होती.

मात्र चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. कोयला' बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करू शकला नाही आणि तो अपेक्षेपेक्षा कमी यशस्वी ठरला. या अपयशामुळे राकेश रोशन यांना आर्थिक आणि मानसिक दोन्ही प्रकारचा फटका बसल्याचे सांगितले जाते.

राकेश रोशन यांचा मुलगा आणि अभिनेता हृतिक रोशनने एका मुलाखतीत कोयला'च्या अपयशानंतर वडिलांची अवस्था कशी झाली होती, याबद्दल खुलासा केला होता. त्याने सांगितले की, या चित्रपटात मोठी गुंतवणूक करण्यात आली होती आणि चित्रपट अपेक्षेप्रमाणे चालला नाही.

ऋतिकच्या मते, या अपयशानंतर राकेश रोशन खूप भावूक झाले होते. त्यांनी आयुष्यभराची कमाई चित्रपटात गुंतवली होती. काही आर्थिक व्यवहारांमध्येही नुकसान झाल्यामुळे त्यांना मोठा धक्का बसला होता. ऋतिकने सांगितले की, वडिलांच्या डोळ्यांत अश्रू आले होते आणि हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळ होता.

माध्यमांतील काही रिपोर्टनुसार, राकेश रोशन यांनी कोयला'च्या अपयशासाठी अप्रत्यक्षपणे माधुरी दीक्षितला जबाबदार धरल्याची चर्चा होती. त्यांनी कथितरित्या असे म्हटले होते की, प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी माधुरीची प्रतिमा त्या वेळी पुरेशी प्रभावी ठरली नाही. ही टिप्पणी सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली होती.

## स्वत:ला सुलतान समजतो का? सलमान खानला वडिलांनी फटकारलं होतं



बॉलीवूडचा भाईजान म्हणून ओळखला जाणारा सलमान खान हा चित्रपटांसह त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतो. चार दशकांपासून त्याच्या चित्रपटांना प्रेक्षक, विशेषत: तरुणांकडून मोठा प्रतिसाद मिळतो. सलमान खानचे त्याच्या कुटुंबासोबत अतिशय घट्ट नाते असून, वडील सलीम खान, आई हेलन आणि सलमा खान आणि दोन्ही भावंडांवर त्याचा जिव्हाळा आहे.

प्रचंड लोकप्रियता मिळालेला सलमान आजही परिवारासह गॅलेक्सीमध्ये राहतो. अलीकडेच सलमान खानने त्याच्या वडिलांबरोबरची जुनी आठवण सांगितली आहे. सलीम खान यांना दिलेल्या महागड्या गिफ्टनंतर वडील त्याच्यावर नाराज झाल्याचा किस्सा त्याने सांगितला आहे.

सलमान खानने व्हरायटी इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये करिअरच्या सुरुवातीच्या काळातील आठवणींना उजाळा दिला. सलमान खानला सर्वांत पहिली महागडी वस्तू कोणती खरेदी केली होती असा प्रश्न करण्यात आला. त्यावर रोलेक्सचे घड्याळ घेतल्याचे त्याने सांगितले. सलमान खानला सिनेविश्वात पाऊल ठेवताना मोठा संघर्ष करावा लागला होता. या स्ट्रगलिंगच्या काळात आर्थिक अडचणी असूनही सलमानने वडील सलीम खान यांच्यासाठी महागडे रोलेक्सचे घड्याळ घेतले. मात्र, हे गिफ्ट पाहून सलीम खान आनंदी झाले नाहीत. उलट पैसे नसताना इतके महागडे घड्याळ घेतल्यामुळे त्यांनी सलमान खानला चांगलेच फटकारल्याचे त्याने या मुलाखतीमध्ये सांगितले.

वडिलांबरोबर घड्याळाचा किस्सा सांगताना सलमान खान म्हणाला की, मी सर्वांत महागडी पहिली वस्तूही रोलेक्सचे घड्याळ घेतले होते. हे घड्याळ मी माझ्यासाठी नाही, तर वडिलांसाठी घेतले होते. तेव्हा नुकतेच काम सुरू केल्यामुळे माझ्याकडे घड्याळ खरेदी करण्याएवढे पैसे नव्हते. रोलेक्सचे ते घड्याळ हे नऊ लाखांना होते आणि माझ्याकडे फक्त चार लाख होते. तरीही उधार ठेवत ते चार-पाच महिन्यांनी पैसे देतील, असा शब्द देऊन घड्याळ खरेदी केले आणि वडिलांना दिले, असे सलमानने सांगितले. मात्र, त्यावर सलीम खान यांची रिॲक्शन वेगळीच आल्याचे त्याने सांगितले. सलमान खान म्हणाला, वडिलांना ते महागडे घड्याळ घेऊन दिल्यानंतर ते ओरडले. अजून तुझे करिअरही सुरू नाही झाले आणि तुझ्या या गोष्टी सुरू झाल्या. काय गरज आहे एवढे महागडे घड्याळ आणि वस्तू खरेदी करण्याची. स्वत:ला काय सुलतान समजतोस का? अशा शब्दांमध्ये सलीम खान यांनी सलमानला फटकारले होते.

# ` कर्करोग रुग्णालय आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुणे महानगरपालिकेच्या जागेवर सामाजिक बांधिलकी जपत उभारण्यात आलेले अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय हे आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पाऊल असून सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून निर्माण झालेले हे केंद्र आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमातून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कर्करोग केंद्राच्या लोकार्पणप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, आमदार राहुल कुल, उपमहापौर परश-ुराम वाडेकर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कर्करोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत आहे. वेळेत निदान आणि उपचार मिळाल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो.

मात्र उपचारात विलंब झाल्यास रुग्णांना दीर्घकाळ उपचार घ्यावे लागतात आणि त्यासाठी मोठा आर्थिक खर्चही करावा लागतो. हीच बाब लक्षात घेत सर्वसामान्य नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांमध्ये कर्करोग उपचारांचा समावेश केला आहे.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कर्करोग ग्रीड' तयार करण्यात येत असून या माध्यमातून राज्यातील रुग्णांना अधिक सक्षम आणि सुलभ उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्यभरातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि समन्वयित करण्यासाठी हे ग्रीड महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी फाउंडेशनच्या माध्यमातून सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारण्यात आलेल्या या उपक्रमाचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी कौतुक केले. कार्यक्रमास महानगपालिकेचे पदाधिकारी, आपुलकी फाउंडेशनचे पदाधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते. तत्पूर्वी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी रुग्णालयाची पाहणी करून विविध उपचार विभाग, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे तसेच रुग्णांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची माहिती जाणून घेतली.

# तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यालयावर छापे; जमिनीची कागदपत्रे, १00हून अधिक आधार कार्ड जप्त

जनप्रवास । प्रतिनिधी

दिल्ली : पश्चिम बंगालमधील तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यालयावर रविवारी मोठी कारवाई करण्यात आली. छापेमारीमध्ये १०० हून अधिक आधार कार्ड आणि सरकारी जमिनीच्या अवैध खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. सॉल्ट लेक परिसरात असलेल्या या कार्यालयात स्थानिक रहिवाशांनी, जप्त केलेल्या वस्तू ताब्यात घेण्यासाठी धाव घेतली. त्यावेळी पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत आधार कार्ड जप्त केली. स्थानिकांच्या मते, ही आधार कार्ड त्याच स्थानिकांची आहेत ज्यांनी धाड पडल्यावर टीएमसीच्या कार्यालयाकडे धाव घेतली होती. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, टीएमसी



कार्यालयात सापडलेली आधार कार्ड स्थानिक रहिवाशांची आहेत. त्यांच्या मते, जेव्हा आधार कार्ड जारी करण्यात आली, तेव्हा ती टीएमसी कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवण्यात आली होती. आधार कार्डबद्दल विचारल्यावर, पक्षाचे सदस्य अनेकदा ती अद्याप आलेली नाहीत असे सांगत असत. स्थानिकांनी ४ मे रोजी कार्यालयाला कुलूप लावले आणि जेव्हा कुलूप उघडण्यात आले, तेव्हा आधार कार्ड जप्त करण्यात आली

. पश्चिम बंगालमध्ये घुसखोरी आणि बनावट आधार कार्डांचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी राहिला आहे. आता, तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यालयातून मोठ्या संख्येने आधार कार्ड जप्त करण्यात आल्यानंतर एक नवीन राजकीय वाद निर्माण झाला आहे. तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यालयातून सरकारी जमिनीच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रे जप्त केल्याने राज्यातील मुख्य विरोधी पक्षाच्या अडचणींमध्येही वाढ होऊ शकते.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसाठी 'POSH' कायद्याची कडक अंमलबजावणी; राज्यभर तपासणी मोहीम

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' अर्थात POSH कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाने दिले आहेत. यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाने महत्त्वपूर्ण शासन परिपत्रक जारी केले असून, विविध आस्थापनांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

राज्यातील ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्या सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या समितीमध्ये किमान ५० टक्के महिला सदस्य असणे, वरिष्ठ महिला कर्मचारी अध्यक्ष म्हणून नियुक्त करणे तसेच बाह्य स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश असणे आवश्यक राहणार आहे.

महिलांच्या तक्रारींसाठी ई-मेल, लेखी अर्ज तसेच SHE-Box पोर्टल यांसारखी विविध माध्यमे उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही शासनाने दिल्या आहेत. तक्रार प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत कार्यवाही सुरू करणे, चौकशीदरम्यान गोपनीयता राखणे तसेच पीडित महिलेला आवश्यकतेनुसार अंतरिम दिलासा देणे याबाबतही स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास विभागाने झजडक अनुपालनासाठी विशेष तपासणी सूची तयार केली असून, त्यामध्ये धोरण, जनजागृती कार्यक्रम, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षिक अहवाल, सुरक्षित कार्यस्थळ आणि POSH पोर्टलवरील नोंदणी यांसारख्या ३१ मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून प्रत्येक आस्थापनामध्ये कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याची पडताळणी केली जाणार आहे.

तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्यास POSH act २०१३ च्या कलम २६ नुसार संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. महिलांना सुरक्षित, सन्मानजनक आणि संवेदनशील कार्यस्थळ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाची ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# मुंबई क्लायमेंट वीकच्या निष्पत्ती व परिणामकारकता अहवालाचे प्रकाशन

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : हवामान बदलाच्या प्रश्नांवर जागतिक स्तरावरील चर्चा आणि प्रत्यक्ष कृती यांचा संगम घडवून आणणाऱ्या मुंबई क्लायमेट वीक'च्या पहिल्या पर्वाच्या परिणाम आणि प्रभाव अहवालाचे (आउटकम अँड इम्पॅक्ट रिपोर्ट') प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीनंतर करण्यात आले. मुंबई क्लायमेंट वीकच्या दुसऱ्या पर्वाचे आयोजन २२ ते २६ फेब्रुवारी २०२७ दरम्यान मुंबईत करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जात असून, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे यजमान संस्थांमध्ये सहभागी आहेत. अहवाल प्रकाशनाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य सरकार आणि पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या पूर्ण सहकार्याची ग्वाही दिली. नागरिकाभिमुख आणि प्रगतीशील हवामान उपाययोजना उभारण्यावर आमचा भर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

# नागरिकांनी घर सुचीकरण व गृहगणनेच्या कार्यात सहकार्य करावे : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

## जिल्ह्यात घरसुचीकरण व गृहगणनेला सुरुवात

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : भारताच्या १६ व्या जनगणनेच्या अनुषंगाने जिल्ह्यात घरसुचीकरण व गृहगणनेच्या प्रकियेला सुरुवात झाली असून जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यात सक्रियपणे सहभाग घेवून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला जिल्ह्यात १ मे २०२६ पासून सुरुवात करण्यात आली असून १५ मे २०२६ अखेर



१ लाख ५३ हजार नागरिकांनी स्व-गणना केली आहे. जनगणनेच्या अनुषंगाने माहिती गोळा करण्यासाठी आजपासून प्रगणक १४ जून २०२६ पर्यंत प्रत्येक घराला भेट देणार आहे. यावेळी प्रगणकांद्वारे गृहगणना करण्यात येणार असून नागरिकांनी आपल्याशी निगडित अचूक माहिती त्यांना द्यावी. आपल्या परिसरातील नागरिकांनाही अद्ययावत माहिती देण्यास प्रोत्साहित करावे.

घरगणनेच्या अनुषंगाने पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिकेसह जिल्ह्यात प्रगणक आणि पर्यवेक्षकांसह सुमारे ३० हजार क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या कामासाठी, भारताचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांच्या कार्यालयाने आखून दिलेली संरचित पाच-स्तरीय प्रशिक्षण प्रणाली लागू करण्यात आली आहे, अशी माहिती श्री. डुडी यांनी दिली आहे. जनगणना कायदा १९४८ च्या तरतुदींनुसार राबवला जाणारा अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय उपक्रम आहे. प्रभावी धोरण निर्मितीला पूरक ठरणारा आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात योगदान देणारा विश्वसनीय माहितीचा संग्रह (डेटा) निर्माण करण्यासाठी सक्रिय लोकसहभाग आवश्यक आहे, नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकाला संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन डुडी यांनी केले आहे.

# सहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नव्या नियमांना मंजुरी!

## राज्यातील १.२५ लाख संस्थांच्या कारभारात होणार मोठे बदल

जनप्रवास । प्रतिनिधी

नागपूर : तब्बल सहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राज्य सरकारने महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था नियमांना अखेर मंजुरी दिली असून, त्यामुळे राज्यातील सुमारे १.२५ लाख सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कारभारात मोठे बदल होणार आहेत.

डिजिटल प्रशासन, पुनर्विकास प्रक्रियेत पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि सदस्यांचा वाढता सहभाग यावर भर देणारे हे नियम पुढील आठवड्यात अधिकृतरीत्या प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्तीनंतर या नियमांचा मसुदा २०२० मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. मात्र विविध स्तरांवरील सल्लामसलत, दुरुस्त्या आणि कायदे व न्याय विभागाकडील तपासणीमुळे अंतिम मंजुरीला विलंब झाला. त्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्था जुन्याच नियमांनुसार कार्यरत होत्या. आता नव्या नियमांमुळे देखभाल शुल्क, थकबाकी, सभासदत्व हस्तांतरण, पुनर्विकास आणि आर्थिक व्यवस्थापनाबाबत स्पष्टता येणार असल्याचे सहकार विभागातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी या नियमांना मंजुरी मिळाल्याची माहिती दिली. हे नियम दीर्घकाळ प्रलंबित होते. सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर त्यांना मंजुरी मिळाली




असून, त्यामुळे अनेक प्रलंबित सुधारणा प्रत्यक्षात लागू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

### डिजिटल कारभाराला अधिकृत मान्यता

कोरोनानंतर गृहनिर्माण संस्थांमध्ये ऑनलाइन बैठका आणि डिजिटल व्यवहार वाढले होते. नव्या नियमांमध्ये प्रथमच ऑनलाइन आणि हायब्रिड वार्षिक सर्वसाधारण सभांना (एजीएम) कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे सदस्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबरोबरच ऑनलाइन माध्यमातूनही सभेत सहभागी होता येणार आहे. याशिवाय डिजिटल मतदानालाही परवानगी देण्यात आली आहे. परराज्यात किंवा परदेशात राहणाऱ्या सदस्यांनाही आता निर्णयप्रक्रियेत अधिक सक्रिय सहभाग घेता येणार असल्याने सभांमधील उपस्थिती आणि सहभाग वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

कोरोनानंतर गृहनिर्माण संस्थांमध्ये ऑनलाइन बैठका आणि डिजिटल व्यवहार वाढले होते. नव्या नियमांमध्ये प्रथमच ऑनलाइन आणि हायब्रिड वार्षिक सर्वसाधारण सभांना (एजीएम) कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे सदस्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबरोबरच ऑनलाइन माध्यमातूनही सभेत सहभागी होता येणार आहे. याशिवाय डिजिटल मतदानालाही परवानगी देण्यात आली आहे. परराज्यात किंवा परदेशात राहणाऱ्या सदस्यांनाही आता निर्णयप्रक्रियेत अधिक सक्रिय सहभाग घेता येणार असल्याने सभांमधील उपस्थिती आणि सहभाग वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### समितीतील रिक्त जागा संस्थांनाच भरता येणार

संस्थांच्या व्यवस्थापन समितीतील आकस्मिक रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेण्याची गरज राहणार नाही. संबंधित संस्था अंतर्गत प्रक्रियेद्वारे या जागा भरू शकतील. त्यामुळे कारभारातील विलंब कमी होऊन संस्थांना दैनंदिन निर्णय अधिक वेगाने घेणे शक्य होईल, असे अधिकाऱ्यांचे मत आहे.

□ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ संपादक –सिध्दार्थ संजय भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com